रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३३०
www.ramprahar.com

मंगळवार, १७ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## पंढरपूर पालखी मार्गावर वारकऱ्यांना टोलमाफी



**मुंबई :** गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने १८ जून ते १० जुलैदरम्यान ही टोलमाफी असणार आहे. पंढरपूरला जाणाऱ्या १० मानाच्या पालखी मार्गावर ही टोलमाफी देण्यात येणार आहे. याचा लाभ वारकरी, मानाच्या पालख्या आणि भाविकांना मिळणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या संबंधित एक परिपत्रक जारी केले आहे. त्यामध्ये पंढरपूरला जाणाऱ्या जड आणि हलक्या वाहनांना टोलमाफीचा फायदा मिळणार आहे. त्यासाठी गाडी क्रमांक, चालकाचे नाव नोंद करून त्याचे स्टिकर्स परिवहन विभाग, पोलीस किंवा आरटीओ यांच्याकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामुळे वारकऱ्यांना आता या मार्गावर कुठलाही टोल भरावा लागणार नाही.

अंतरंग

माणगावमध्ये वस्तीनजीक आढळले मगरींचे वास्तव्य/२

रायगडावर गर्दी; रोप वेवर ताण; पार्किंगही फुल्ल!/५

किकबॉक्सिंग स्पर्धेत खांदा कॉलनी शाखा अव्वल/८

# विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळा गजबजल्या; प्रवेशोत्सव उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

सुमारे दोन महिन्यांच्या सुट्टीनंतर सोमवार (दि.१६) पासून रायगड जिल्ह्यातील शाळा पुन्हा एकदा सुरू झाल्या. या वेळी विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने परिसर गजबजून गेला.

जिल्हा परिषद शाळांमध्ये शासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करून त्यांचे स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नवगाव येथे, पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी वेश्वी, तर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी कुरूळ येथील शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

शाळेचा पहिलाच दिवस असल्याने आपले मित्र, मैत्रिणी पुन्हा भेटणार म्हणून विद्यार्थी आनंदात होते. काही लहान मुलांची रडारड सुरू होती. पालक त्यांची समजुत काढत होते. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी मोठ्या आनंदात शाळेत येत होते. जुने सवंगडी भेटल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर होता. **(छायाचित्रे पान ५ वर..)**

**पहिल्याच दिवशी पुस्तकांचे वाटप**

शाळेच्या पहिल्याच दिवशी जिल्हा परिषद, खासगी अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीपर्यंतच्या एक लाख ८१ हजार विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटण्यात आली तसेच सुमारे ९८ हजार विद्यार्थ्यांना गणवेश, बुट, सॉक्सचे वाटप करण्यात आले.





## आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी केले नवागतांचे स्वागत

**पनवेल, उरण : रामप्रहर वृत्त**

नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी प्रवेश केला असून पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. या वेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप करण्यात आले.

रायगड जि.प.च्या कळंबोली प्राथमिक शाळेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाला माजी नगरसेवक गोपाळ भगत, रवींद्र भगत, विजय खानावकर, राजेंद्र शर्मा, भाजपचे कळंबोली मंडळ माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, शाळा व्यवस्थापक संस्थेचे अध्यक्ष अनंत भगत आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# भाजप कोकण विभागीय आढावा बैठक

## प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या ११ वर्षांतील मोदी सरकारच्या 'संकल्प से सिद्धी तक' या प्रवासातील यशस्वी कामगिरीचा आलेख महाराष्ट्रातील प्रत्येक घरापर्यंत पोहचवण्याचा दृढनिश्चय महाराष्ट्र भाजप परिवाराने केला आहे. याच उद्देशाने कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग विभागीय आढावा बैठकीचे आयोजन रविवारी (दि. १५) पनवेलमध्ये करण्यात आले होते. या बैठकीत भाजप प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण संवाद साधत मार्गदर्शन केले.




खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात झालेल्या या बैठकीला खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, कोकण विभागीय संघटन मंत्री शैलेंद्र दळवी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, भाजप खोपोली शहर मंडळ अध्यक्ष राहुल जाधव, खालापूर पूर्व मंडळ अध्यक्ष सनी यादव, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, विकास खुरपूडे, चंद्रप्पा अनिवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीत कोकणातील संघटनात्मक बांधणी, बूथ पातळीवरील व्यवस्थापन तसेच लोकांपर्यंत प्रभावीपणे संवाद साधण्याच्या रणनीतीवर सखोल चर्चा झाली. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या वेशात कमळ परिधान करून अभिमानाने भाजपचे प्रतिनिधित्व करावे आणि मोदी सरकारच्या विकासकार्याचा घरोघरी प्रचार करणे ही काळाची गरज आहे. **(पान २ वर..)**

# रायगडात पावसाचा जोर कायम

**अलिबाग : प्रतिनिधी**

सलग दुसऱ्या दिवशी रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर कायम दिसून आला. जिल्ह्यातील बहुतांश भागात सोमवारी (दि. १६) पावसाची संततधार सुरू होती. दरम्यान, हवामान विभागाकडून २४ तासांकरिता जिल्ह्याला रेड अलर्ट देण्यात आला आहे.

**रेड अलर्ट जाहीर**



रायगड जिल्ह्यात रविवारी रात्रीनंतर पावसाचा जोर वाढला. सोमवारी सकाळपर्यंत पावसाच्या जोरदार सरी कोसळत होत्या. सकाळच्या सत्रात थोडी उघडीप दिल्यानंतर पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले.

सलग दोन दिवस सुरू असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील नद्यांच्या पातळीत मोठी वाढ झाली. कुंडलिका आणि अंबा नद्यांनी सोमवारी सकाळी ११ वाजता इशारा पातळी ओलांडली होती. त्यामुळे रोहा आणि नागोठणे परिसराला सतर्कतेचा इशारा देण्यात आला. पावसाचा जोर कायम राहिल्यास या दोन्ही शहरांना पूर परिस्थितीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. पावसामुळे पाताळगंगा, उल्हास आणि सावित्री नदी यांच्या पाणी पातळीतदेखील वाढ झाली आहे.

**तालुकानिहाय पडलेला पाऊस**

तळा १४५ मिमी, खालापूर १०८ मिमी, पोलादपूर १०७ मिमी, माणगाव १०४ मिमी, सुधागड ९७ मिमी, उरण ९६ मिमी, महाड ९३ मिमी, मुरुड ८८ मिमी, अलिबाग ७५ मिमी, कर्जत ७४ मिमी, म्हसळा ७० मिमी, पेण आणि रोहा प्रत्येकी ६५ मिमी, माथेरान ६२ मिमी, पनवेल ४९ मिमी, श्रीवर्धन ४५ मिमी.

## निवडक

### एमएचटी सीईटी पीसीएम परीक्षेचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली :** विद्यार्थ्यांसह पालकांची उत्सुकता लागलेल्या यूजी (नीट) परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर सोमवारी (दि. १६) अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि कृषी (पीसीएम) अभ्यासक्रमाच्या एमएचटी सीईटी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत एकूण २२ विद्यार्थ्यांना १०० पर्सेंटाइल गुण मिळाले आहेत, तर भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीबी) अभ्यासक्रमाचा निकाल मंगळवारी (दि. १७) जाहीर होणार आहे.

### मोसमी वाऱ्यांची आगेकूच; मान्सून सर्वदूर सक्रिय

**पुणे :** मागील अनेक दिवसांपासून प्रवास मंदावलेल्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी अखेर आगेकूच केली. त्यामुळे संपूर्ण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा मोसमी पावसाने व्यापला आहे, तर विदर्भातील बहुतांश भाग मोसमी पावसाने व्यापला. लवकरच तो सर्वत्र पोहचेल. दरम्यान, मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय झाल्याने संपूर्ण राज्यात जोरदार पाऊस कोसळत आहे. पावसामुळे हवेत गारवाही निर्माण झाला आहे.


# पंतप्रधान नरेंद्र मोदींना सायप्रसचा सर्वोच्च सन्मान

**निकोसिया : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. युरोपियन देश सायप्रसच्या दौऱ्यावर असलेले पीएम मोदींना या देशाचा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. हा सन्मान मिळवणारे ते जगातील २३वे नेते आहेत.

सायप्रसची राजधानी निकोसियामध्ये अध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिड्स यांनी पंतप्रधान मोदींना सायप्रसचा सर्वोच्च सन्मान 'ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस III' देऊन सन्मानित केले. हा सन्मान मिळाल्यानंतर पंतप्रधान मोदी म्हणाले, सर्व भारतीयांच्या वतीने, मी अत्यंत नम्रतेने आणि कृतज्ञतेने हा सन्मान स्वीकारतो. यासाठी मी सायप्रसचे अध्यक्ष, सरकार आणि जनतेचे मनापासून आभार व्यक्त करतो.

या सन्मानाचे महत्त्व मी जाणतो. मला विश्वास आहे की, येणाऱ्या काळात आमची सक्रिय भागीदारी नवीन उंची गाठेल. एकत्रितपणे आपण केवळ आपल्या देशांच्या विकासाला बळकटी देऊ शकत नाही, तर शांततापूर्ण आणि सुरक्षित जागतिक वातावरण निर्माण करण्यासाठी एकत्रितपणे योगदान देऊ, अशा भावना पंतप्रधान मोदींनी व्यक्त केल्या.



**हा सन्मान केवळ नरेंद्र मोदींसाठी नाही, तर १४० कोटी भारतीयांसाठी आहे. आपल्या देशाच्या वसुधैव कुटुंबकमच्या संस्कृती, बंधुता आणि विचारसरणीचा हा सन्मान आहे. मी हा सन्मान भारत आणि सायप्रसमधील मैत्रीपूर्ण संबंधांना, सामायिक मूल्यांना आणि परस्पर समंजसपणाला समर्पित करतो.**
**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# सर्वांनी एकत्र येत सामाजिक कार्य केले पाहिजे

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; समाजभूषण पुरस्काराने सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपापसात भांडणे केल्याने कोणाचीही प्रगती होत नाही. म्हणून समाजभेद बाजूला ठेवत 'हम सब एक हे' हा नारा देऊन आपण सामाजिक कार्य केले पाहिजे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी हिंदू लोहार समाज पनवेल तालुका सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आयोजित सर्वसाधारण सभेत केले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना लोहार समाजाचा समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.




हिंदू लोहार समाज मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात ज्येष्ठ समाजबांधव दत्तात्रेय गजानन मोरे यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (दि. १५) झाली. या सभेला ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, समाजाचे अध्यक्ष गणेश राऊत, अण्णासाहेब जोशी, ॲड. युवराज जाधव, सुरेश मांडवगडे, दिलीप वसव, राजेश सोमवंशी, मंडळाचे अध्यक्ष संतोष जाधव, चंद्रकांत भागीवंत, शैलेश जगताप, अविनाश मोरे, शशिकांत दळवी, अजित मोरे, राजेंद्र पायरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजबांधव उपस्थित होते.

या वेळी मनोगत व्यक्त करताना हिंदू लोहार समाजाची गरज ओळखून समाज हॉलसाठी जागा घेण्याकरिता लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी २५ लाख रुपये, तर ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांनी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली. या वेळी म्हात्रे यांनी, समाजाची जाण ठेवून सर्वांनी काम करावे, असे प्रतिपादन केले, तर आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपण समाजाचे काही तरी देणश लागतो ही भावना मनात ठेवून हिंदू लोहार समाज मंडळ सामाजिक कार्य करत आहे, असे गौरवोद्गार काढले.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ॲड. युवराज जाधव, मंदार मने, डॉ. सुरूची जोशी, किरण भागवत आणि दिलीप लोहार यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले तसेच विद्यार्थी गुणगौरव आणि लोहारकाम करणाऱ्या समाजबांधवांचा सन्मान या वेळी समाजाच्या वतीने करण्यात आला.



## कशेडी भुयारी मार्गाजवळ दरड कोसळली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पावसामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गावर दरड कोसळली. यामुळे काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला.

दोन दिवस संततधार पडणाऱ्या पावसामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्याच्या हद्दीत कशेडी भुयारापासून २०० मीटर अंतर आधी दरड कोसळली. ही घटना रविवारी (दि.१५) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घडली.

या घटनेची माहिती मिळताच कशेडी महामार्ग पोलीस मदत केंद्राचे पोलिसांनी धाव घेत वाहतूक सुरळीत सुरू ठेवण्याचे प्रयत्न केले, तर एसडीपीएल शिंदे डेव्हलपर्स कंपनीकडून यंत्रणा पाठवून दरड हटविण्याचे काम सुरू झाले.

गेल्या महिन्यातही याच ठिकाणी दरड कोसळून वाहतुकीस धोका निर्माण झाला होता.

## बच्चू कडू जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून अपात्र

**अमरावती : प्रतिनिधी**

प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांना अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून बच्चू कडू यांना अपात्र ठरवण्यात आले आहे. विभागीय सहनिबंधक यांनी न्यायालयाच्या एक वर्षाच्या शिक्षेचा ठपका ठवेत कडू यांच्याबाबत हा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.



बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड यांच्यासह ११ संचालकांनी अध्यक्ष बच्चू कडू यांना संचालकपदावरून अपात्र करण्याबाबतची याचिका दाखल केली होती. नाशिक न्यायालयाने कडू यांना शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी एका वर्षाची शिक्षा ठोठावली असल्याचा दाखला त्यांनी यामध्ये दिला. याचाच आधार घेत विभागीय सहनिबंधक यांनी कडू यांना अध्यक्षपदावरून अपात्र ठरवले आहे. कडू यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

# वाशीत जमीन खचून भिंत कोसळली

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर १७मधील प्लाझा सोसायटीत येथे सोमवारी (दि. १६) जमीन खचल्याने सुरक्षा सीमा भिंत कोसळली. त्यामुळे पार्क करण्यात आलेल्या १५ ते २० गाड्यांचे नुकसान झाले आहे. शिवाय संकुलातील सांडपाणी व्यवस्थाही कोलमडली.

**[ वाहनांचे नुकसान ]**

नवी मुंबईत सोमवारी सकाळपासून जोरदार पाऊस पडत होता. या दरम्यान वाशीत प्लाझा सोसायटीची भिंत खचली. घटनास्थळी अग्निशमन दल दाखल झाले. त्यांच्याकडून नाल्यात गेलेली वाहने बाहेर काढण्याचे व कोसळलेली झाडे हटवण्याचे काम हाती घेण्यात आले.

दरम्यान, मुसळधार पावसामुळे ठाणे-बेलापूर मार्गासह सायन-पनवेल महामार्ग, एमआयडीसीतील रस्ते जलयम झाले होते. रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला, तर काही वाहनांमध्ये पाणी साचून ती बंद पडण्याच्या घटनादेखील घडल्या.



# ‘भाजप सार्वजनिक गणेशोत्सव बंद होऊ देणार नाही’

**मुंबई : प्रतिनिधी**

शहरी नक्षलवाद्यांच्या अजेंड्याच्या मागे लागून काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि उबाठा सेनेने कितीही प्रयत्न केले तरी हिंदुत्वाचे प्रतिक असलेला सार्वजनिक गणेशोत्सवाची पंरपरा भाजपा कधीच खंडित होऊ देणार नाही. पीओपीमुर्तीवरील बंदी उठली असून आता मोठ्या गणेशमुर्त्यांच्या समुद्रातील विसर्जनाबाबतही शासन ३० तारखेपर्यंत आपली भूमिका न्यायालयात मांडेल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांनी स्पष्ट केले.



अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघ, महाराष्ट्र राज्य श्री गणेश मूर्तिकार कामगार संघटना, अखिल सार्वजनिक उत्सव समिती, सार्वजनिक उत्सव समिती, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आज परेलच्या शिरोडकर सभागृहात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आणि गणेश भक्तांचा जाहिर मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक व माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार यांनी मार्गदर्शन केले. या मेळाव्याला आमदार कालीदास कोळंबकर, संजय उपाध्याय, यांच्यासह माजी आमदार मधू चव्हाण, अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाचे अध्यक्ष जयेंद्र साळगावकर, कार्याध्यक्ष सुहास आडिवरेकर, प्रमुख कार्यवाह सुरेश सरनोबत, महाराष्ट्र राज्य श्री गणेश मूर्तिकार कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र राऊत, अखिल सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष हितेश जाधव, सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष अरुण दळवी आणि पदाधिकारी यावेळी सहभागी झाले होते.

या वेळी मंत्री शेलार यांनी सांगितले की, उध्दव ठाकरे यांचे सरकार राज्यात असताना आणि त्यांची सत्ता मुंबई महापालिकेत असतना त्यांनी वेळावेळी गणेशोत्सवाच्या बाजून उभे राहयचे सोडून विरोधातच भूमिका प्रत्येक ठिकाणी मांडल्या.

त्यासाठी आपल्या भूमिकांना आधार म्हणूनच मद्रास उच्च न्यायालय आणि तेलंगनाच्या उच्च न्यायालयाच्या निवाड्यांचा आधार घेतला व पीओपीवर बंदी अधिक कडक करुन मुर्तीकारांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान रचले. यांचे हिंदुत्व बेगडी असून पडद्या आडून यांनी सुमारे ६०० कोटींची उलाढाल असलेला मुर्तीकरांचा व्यवसाय तर पुजा साहित्य, मंडप, आणि इतर सगळया बाबी लक्षात घेता सुमारे २५००० कोटींची उलाढाल असलेला सार्वजनिक गणेशोत्सव बंद करण्याचे एक षडयंत्रच यांनी रचले होते ते आता पीओपी बंदी उठल्यानंतर उघड झाले आहे, असा अरोप करीत ॲड आशिष शेलार यांनी आपल्या ४०मिनिटांच्या भाषाणत २००३ पासून सन २०२४ पर्यंतच्या संपुर्ण कालखंडात याबाबत न्यायालयात घडलेल्या सर्व घटनांचा तारिखवार तपशिलच सादर केला.

तसेच आम्हाला प्रश्न विचारणाऱ्यांनो आम्ही केव्हाही चर्चेला तयार आहोत तुम्ही या हवं तर गणेशभक्तांसाठी आम्ही मातोश्रीवर येऊन चर्चा करायला तयार आहोत. सगळया प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. का तुम्ही त्यावेळी उत्सवांच्या बाजूने, मुर्तीकरांच्या बाजूने उभे राहिला नाहीत, का तुम्ही उत्सव बंदीसाठीच प्रयत्न करीत राहिलात, हेच तुमचे हिंदुत्व का? असा थेट सवालही मंत्री शेलार यांनी केला

तसेच महाविकास आघाडीचे मधील विशेषत: उबाठा ही गणेशोत्सव विरोधी आहे. हे तुम्ही गल्लगल्लीत जाऊन सांगा यांचे हिंदुत्व बेगडी आहे, फसवे आहे यांचे असली चेहरे आता उघड झाले आहेत ते तुम्ही जनतेसमोर मांडा, असे आवाहन ही त्यांनी उपस्थितांना केले. ही लढाई आम्ही अर्धी जिंकली आहे आता मोठया गणेशमुर्त्यांचे काय करणार, असा सवाल आम्हाला विचारत आहेत त्यांना देखील आम्ही कायद्यात राहून उत्तर देऊ, ३० तारखेच्या आत सरकार याबाबत आपली भूमिका न्यायालयात मांडेल, असेही त्यानी स्पष्ट केले.

# माणगावात वस्तीनजीक आढळून आले मगरीचे वास्तव्य

### वन विभागामार्फत घरट्याला संरक्षण

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यात काळ नदीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून मगरींचे वास्तव्य आहे, काळ नदीकिनारी त्यांना मुबलक नैसर्गिक अधिवास आहे, माणगांव शहर हे पूर्वी छोटे गाव होते त्याची आता विकासकामांबरोबर विकासाबरोबर व्याप्ती वाढलेली आहे. त्यामुळे जवळील वन्यजीवांच्या नैसर्गिक निवासस्थानांवर परिणाम होत असल्याचा दिसून येत आहे, परिणामतः हे वन्यजीव व ह्या मगरी शहरामध्ये मानववस्तीनजीक दिसून येत आहेत,

खांदाड गावात सोनभैरव मंदिर परिसरात काळ नदीकिनारी एका मगरीचे घरटे आढळून आले आहे, येथे मगरीची अनेक पिल्ले दिसून येत आहेत, खबरदारी म्हणून माणगांव वनविभागाने तत्परतेने त्वरित योग्य ती कारवाई करून ह्या मगरीचे घरटे येथे सुरक्षित केले आहे जेणेकरून ह्या मगरीला व तिच्या पिल्लांना कोणतीही इजा पोहोचणार नाही, व मोठ्या मगरीपासून पिल्लांच्या बचावाकरिता देखील कोणत्याही नागरिकांवर मगरीच्या हल्ला होणार नाही व कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे, सदरचा परिसर वनविभागाकडून त्वरित निषिद्ध करण्यात आला आहे. सदरचे मगरीचे घरटे सुरक्षित करण्याकरिता माणगांव वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत शिंदे



**नदीकिनारील नागरिकांनी पावसाळ्यात खबरदारी घ्यावी. पूरपरिस्थितींमुळे मगरी-साप तसेच इतर वन्यजीव मानव वस्तीनजीक आसरा घेण्यासाठी येऊ शकतात. नागरिकांना खबरदारी घेऊन त्वरित वनविभागाकडे संपर्क साधावा. वनविभाग वन्यजीव व नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर आहे.**

**-प्रशांत शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी, माणगाव**

व वनपाल ज्ञानदेव सुभेदार यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक पवन चौधरी व वनमजूर गणेश शिर्के, सुनिल तोंडलेकर, अनिल पवार, रुपेश हिलम व बाळू जाधव यांनी योग्य ती कार्यवाही केली आहे.

पावसाळ्यात नदीला येत असणाऱ्या मोठ्या पुरामुळे मगरी प्रवाहात वरती छोट्या ओढ्यामध्ये व शेतांमध्ये घुसण्याची शक्यता असते, त्यामुळे नदीकिनारील नागरिकांनी भयभीत न होता तसेच मगर पाहण्यासाठी गर्दी न करता, मगरींना कोणत्याही प्रकारची हानी न पोहोचवता वनविभागाकडे किंवा स्थानिक बचाव पथकांकडे संपर्क साधावा

# पावसाळी पर्यटनस्थळी पोलिसांसह महसूल विभागाची पाहणी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील धरण, तलाव, धबधबे या क्षेत्रात तहसीलदार अभय चव्हाण व पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी भेटी देऊन प्रत्यक्ष माहिती घेऊन पाहणी केली.

खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील धरण,तलाव,धबधबे, दरड प्रणव क्षेत्र येथे प्रत्येक वर्षी जिवीत हानी होत असल्यामुळे खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस उप निरीक्षक विशाल पवार यांच्या सोबत खालापूर हद्दीतील दरड ग्रस्त क्षेत्र,



धरण, तलाव व धबधबे यांची संयुक्तीक पाहणी केली व आवश्यक त्या ठिकाणी उपाययोजना करणेबाबत सूचना केल्या,

यावेळी पोलीस पाटील अनंत ठोंबरे, गाव पोलीस पाटील, मंडळ अधिकारी माणिक सानप, तलाठी हे उपस्थित होते. कालच नढाल येथील पळसाई धरणात एकाचा मृत्यू झाला आहे.

## मेहेंदळे हायस्कूलमध्ये प्रवेशोत्सव

**नागोठणे : प्रतिनिधी**

रोहा येथील कोकण एज्युकेशन सोसायटीचे मेहंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सोमवारी शालेय प्रवेशोत्सव आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य रमेश मोरे यांच्या हस्ते नवीन विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप पुस्तके वाटप त्याच सोबत भेट व गुलाबापुष्प देऊन नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



# माथेरानकर नवीन मिनीबसच्या प्रतीक्षेत

**माथेरान : बातमीदार**

माथेरानसाठी २००८ मध्ये कर्जत नेरळ मार्गे माथेरान मिनीबस सेवा सुरू होऊन जवळपास सतरा वर्षे पूर्ण झाली आहेत.सर्वसामान्य लोकांना स्वस्त व सुरक्षित प्रवासाची हमी असणाऱ्या मिनीबस जुन्या झाल्याने अनेकदा घाटरस्त्यात बंद पडण्याच्या घटना घडत असतात.त्यामुळे प्रवाशांना पायपीट करावी लागते.मात्र माथेरानकर अजूनही नवीन मिनीबसच्या प्रतिक्षेत आहेत.याकामी निदान परिवहन मंत्र्यांनी लक्ष केंद्रित केल्यास नवीन बसेस उपलब्ध होऊ शकतात अन्यथा प्रवाशांना नेहमीप्रमाणे अडचणींना सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मागील वर्षी २०२४ मध्ये मंत्री उदय सामंत यांनी कर्जत आगाराला नवीन बस देण्याचे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे नवीन पाच बस



आल्या आहेत.परंतु अद्याप या कर्जत-माथेरान मार्गावर नवीन बस उपलब्ध झालेल्या नाहीत.त्यामुळे स्थानिकांमध्ये नाराजीचा सूर उमटताना दिसत आहे.स्थानिकांनी अनेकदा संघर्षाला सामोरे जाऊन सुरक्षित प्रवास उपलब्ध व्हावा यासाठी ही मिनीबसची सेवा उपलब्ध करून घेतली होती. त्यावेळेस या मार्गावर दोन बसेस देण्यात आल्या होत्या परंतु यातील एक बस कर्जत पनवेल अशी फेऱ्या मारत असून एकच बस कर्जत नेरळ मार्गे माथेरान अशा फेऱ्या करत आहे.

घाट रस्त्यात ही बस वारंवार बंद पडत असते.यामुळे शालेय विद्यार्थी, व्यापारी वर्ग त्याचप्रमाणे नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. मिनीबसच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातून सर्वाधिक भरघोस उत्पन्न मिळत असताना देखील परिवहन महामंडळ इकडे का दुर्लक्ष करीत आहेत असा प्रश्न अनेकांमधून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाच्या आणि राजकीय नेत्यांच्या दुर्लक्षामुळे या गलथान कारभाराबाबत स्थानिकांमधून प्रचंड नाराजी दिसून येत आहे.

नेरळ कर्जत अथवा बदलापूर या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मिनीबस सेवा ही जीवनवाहिनी बनली आहे.आजवर शेकडो विद्यार्थ्यांनी परिसरात जाऊन महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्याने ही मुले विविध क्षेत्रात, व्यवसायात, नोकरीत चांगल्या हुद्द्यावर कार्यरत आहेत तर नियमितपणे प्रवास करणाऱ्या व्यापारी वर्गाला स्वस्त आणि सुरक्षित प्रवास करण्यासाठी ही सेवा खूपच सोयीस्कर बनलेली आहे.

कर्जत तालुक्यात सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणारी ही एकमेव बस आहे.परंतु ही बस आता खूपच म्हातारी झाली असून नव्या बसेस लवकरच सुरू कराव्यात अशी मागणी जोर धरू लागली आहे.


# खोपोलीत एसटी स्थानकांत खासगी वाहने; बसचालक हैराण

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली शहरात वाहन तळांची समस्या गंभीर झाली असून वाहन चालक शासकीय कार्यालय, खाजगी जागा दुकाना समोरील जागा अशा जागांची निवड वाहन पार्किंगसाठी करत असतानाच , एसटी बस स्थानकात वाहन पार्किंग करून बाजारहाट करायला जात असल्याने बस चालक वाहन मालकांच्या मनमानी व बिंदास कारभाराला कंटाळले असून अनेक तक्रारी करुन ही सुधारतं नसल्याने करायचे तरी काय असा सवाल करीत आहेत .

या ठिकाणाहून पाली, पेण, कर्जत, तसेच ग्रामीण भागातील आडोशी, वाशिवली, खरीवली, गोरठण अशा ठिकाणी एसटी बस जात असताना बस थांबविणे व वळविण्यात मोठी अडचण निर्माण होत असुन बस फिरवताना मोठे जिकिरीचे झाले आहे वाहन पार्किंगच्या संदर्भात अनेक वेळा दमबाजी व हाणामारी सारखे प्रसंग घडत आहेत . पोलीसही हतबल झाले असून वाहन चालकांवर कोणती कारवाई करायची आहे अशा संभ्रमात पडले आहेत .

खोपोली पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत यांनीजातीने मुंबई पुणे जुन्या महामार्गावर उभे राहून वाहन चालकांना शिस्तीचे धडे दिले संपूर्ण कर्मचारी ट्राफिक कंट्रोल करण्यात गुंतवले, तरीही हम नही सुधरेंगे च्या भूमिकेत चालक वावरत असून वाहन चालक, मालकांनी एसटी थांब्याचाच ताबा घेतला आहे बस स्थानक खाजगी वाहन पार्किंगचा अड्डा बनला आहे एसटी चालक अनेक वेळा या खाजगी कारवाल्याकडे पार्किंगच्या जागेसाठी विनवणी करीत असतात मात्र कार चालक अरेरावी करतात..अशा चालकांवर कारवाई करण्याची मागणी पत्रकार मेहबूब जमादार यांनी केली आहे.



**सध्या शाळा सुरू झाल्या असल्याने विद्यार्थ्यांना व पालकांना सुलभ प्रवास व्हावा यासाठी खोपोली भाजी बाजार समोरील मार्ग मोकळा करून दिला आहे. बस स्थानकात वाहन पार्किंग करणाऱ्या मालक चालकांवर टोईंग व्हॅन मार्फत कारवाई केली जात आहे**

**शितल कुमार राऊत,**
खोपोली पोलीस निरीक्षक

पान १ वरून

## आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी केले नवागतांचे स्वागत

उरण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या नागाव येथील शाळेत आमदार महेश बालदी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या वेळी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना शालेय जीवनातील आठवणींना उजाळा मिळाल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाला भाजप उरण विधानसभा संपर्क प्रमुख रवी भोईर, माजी शहराध्यक्ष कौशिक शाह, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, गटशिक्षण अधिकारी निर्मला घरत, ग्रामसेवक किरण केणी, मुख्याध्यापिका कल्पना पाटील, सरपंच चेतन गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य दीपिका पाटील, अमृता घरत, माजी सरपंच हरेश कातकरी, सूरज ठवले, रोहन पाटील, दैवत घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाजप कोकण विभागीय आढावा बैठक

हे कार्य प्रत्येक कार्यकर्त्याने स्वतःचे दायित्व समजून पार पाडावे, अशा सूचना करण्यात आल्या. हे अभियान म्हणजे केवळ माहिती प्रसार नव्हे, तर एक जनतेशी भावनिक नाते निर्माण करण्याचा संकल्प आहे, ज्यातून २०२४नंतरची नवी भारतनिर्मिती अधिक भक्कम होणार आहे, असेही नमूद करण्यात आले.

***अनेकांनी हाती घेतले ‘कमळ’***

***या वेळी खोपोली नगरपालिका क्षेत्रातील उद्योजक यशवंत साबळे, सुहास वझरकर, मंगेश सुर्वे, युवा उद्योजक विक्रम साबळे, अजिंक्य तावडे, माजी नगरसेवक अविनाश तावडे, गगनगिरी मित्र मंडळाचे अध्यक्ष महेंद्र खोत, सामाजिक कार्यकर्ते दिलीप देशमुख, सामाजिक कार्यकर्ते भिमा मोरे, ईर्शाद खान, चिराग रावळ, अतुल पवार यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी पक्षात स्वागत केले.***



# दीड महिन्यानंतर शाळा सुरू; शुभारंभ दिन विद्यार्थ्यांना ओढ लावणारा

**तळा: प्रतिनीधी**

तळा तालुक्यातील जि.प.तळे मराठी शाळा येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६या वर्षाचे शाळा शुभारंभ दिन व प्रवोशोत्सव रायगड जिल्हा उपशिक्षणाधिकारी संतोष शेंडगे यांच्या उपस्थितीत पाठ्यपुस्तक व गणवेश, वाटप करण्यात आले.

यावेळी शाळा व्यवस्थापन अध्यक्ष भास्कर गोळे,उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती वेदिका गोरीवले,नगरसेवक नरेश सुर्वे ,मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, सहशिक्षक सुनिल बैकर,मित्तल वावेकर, आदि उपस्थित होते.

यावेळी प्रवेशोत्सवास भेट देणारे उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे यांनी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देउन म्हणाले कि जि.प.शाळा ह्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देते .मुलांना येथे पाठ्यपुस्तक, गणवेश दिले जात आहे.व दर्जेदार शिक्षण मिळते.तळा मराठी शाळेचे शिक्षक हे मुलांना चांगले शिक्षण देत आहेत.तालुक्यात ह्या शाळेतील मुल शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करीत आहेत.त्याचे श्रेय येथिल शिक्षकांना आहे.




यावेळी प्रवेश घेणारे विद्यार्थी. पालकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.तालुक्यातील सगळ्याच शाळेत सकाळी प्रभात फेरी काढून नंतर प्रथमच पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थाला गुलाब पुष्प देऊन मोठ्या उत्साहात स्वागत केले.नंतर पाठ्यपुस्तक, गणवेश, शैक्षणिक साहित्य वाटप व गोड खाऊ वाटप करून विविध उपक्रमांनी शाळा शुभारंभ व प्रवेशोत्सव साजरा झाला.

तळा तालुक्यातील तहसिलदार स्वाती पाटील व गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांनी कळमशेत व मालाठे शाळांना भेटी दिल्या तसेच अनेक अधिकाऱ्यांनीही शाळेला भेटी दिल्या.

### दुखवटा

## अरविंद कुलकर्णी



**मुंबई :** ज्येष्ठ पत्रकार अरविंद विठ्ठल कुलकर्णी यांचे सोमवारी (दि. १६) सकाळी आकस्मिक निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तिन मुलगे आहेत. आचार्य अत्रे यांच्या ’मराठा’ मधून पत्रकारितेला प्रारंभ करणाऱ्या अरविंदरावांनी त्यानंतर दीर्घकाळ इंग्रजी भाषेतील ’मिड डे’मध्ये राजकीय संपादक या पदावर काम केलं.’रामप्रहर’मध्येही त्यांनी लेखन केले होते निरपेक्षपणे, पण पुढे होत, लढाऊपणे हिंदुत्वाचे काम करणारा एक स्वयंसेवक पत्रकार, मार्गदर्शक म्हणून अरविंद विठ्ठल कुलकर्णी हे नाव पत्रसृष्टीत दीर्घकाळ स्मरणात राहील.

# शाळेची घंटा पुन्हा वाजली! विद्यार्थीवर्गाचे जोरदार स्वागत




**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे आज शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत केले गेले मे महिन्याची उन्हाळी सुट्टी संपून सर्व बालचमू पुन्हा शाळेसाठी नव्याने सज्ज झाला.

घंटा वाजली आणि विद्यालयात पुन्हा गजबजाट झाला. विद्यालयाच्या प्राचार्या सौ. स्वप्नाली म्हात्रे यांच्या नियोजनबद्ध व विद्यार्थी केंद्रित संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी फुग्यांची सजावट, सुंदर रांगोळी, फलक तसेच प्रत्येक वर्ग खोलीला स्वागताचे तोरण अशी उत्तम तयारी केली गेली.

या स्वागतानंतर विद्यार्थ्यांसाठी छोटेखानी कार्यक्रम व विशेष प्रार्थनेचे आयोजनही केले गेले. यामध्ये पाहुण्यांचे स्वागत करून सरस्वती आणि गणपती यांचे पूजन केले गेले. पाहुण्यांच्या स्वागता बरोबरच प्रमुख पाहुण्यांचे विचार विद्यार्थ्यांना ऐकायला मिळाले. या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनीही विद्यार्थ्यांची संवाद साधला यावेळी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी केल्याबद्दल त्यांचा गुणगौरव करण्यात आला. ज्याचे पारितोषिक वितरण समारंभही या वेळी झाला. अतिशय उत्साहात व आनंदाने हा देखणा सोहळा झाला.

या कार्यक्रमास जनार्दन भगत संस्थेच्या बोर्ड कार्यकारी सदस्या वर्षा ठाकूर, स्कूल कमिटी मेंबर राजेश गायकर, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, रायगड विभागाचे पी.आर.ओ. बाळासाहेब कारंडे आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी उत्तम उत्तम कामगिरी करावी यासाठी शुभेच्छा देऊन त्यांचे विद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांनी केले. या कार्यक्रमास सर्व पर्यवेक्षिका सारिका लंजुडकर, नेहा खन्ना, मिनल नाईक, शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पनवेल मनपाच्या शाळेत विद्यार्थ्यांचे औक्षण

### नगरसेवक, अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पुस्तक वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या १० शाळांमध्ये पहिल्या दिवशी पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन, औक्षण करून, ढोल ताशांच्या गजरात आज जोरदार स्वागत करण्यात आले. याचबरोबर '१०० शाळांना भेटी देणे' या उपक्रमांतर्गत शाळेच्या पहिल्या दिवशी महापालिका अधिकाऱ्यांनी विविध शाळांना सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप केले.

शासनाच्या वतीने '१०० शाळांना भेटी देणे' हा उपक्रम राबवण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. या उपक्रामांतर्गत अधिकाऱ्यांनी शाळांना भेट देऊन प्रवेशोत्सवात सहभागी होऊन पुस्तक वाटप करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या उपक्रमांतर्गत लोकनेते दि.बा. पाटील शाळेमध्ये अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे व उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन, पुस्तक वाटप करण्यात आले. तसेच शाळेची पाहणी करण्यात आली. या वेळी शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण व मुख्याध्यापक राठोड उपस्थित होते.

तसेच अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी हिरवे गुरूजी मनपा प्राथमिक शाळा (दगडी शाळा) येथेही सदिच्छा भेट दिली. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, शाळा व्यवस्थापन समिती मार्गदर्शक वत्सराज व सुजित म्हात्रे, कमल तायडे, वैभव पाटील, वैशाली सावळे, अर्चना माने, स्वाती पाटील, सीमा रांगले, मयुरी भोईर आदी उपस्थित होते.

तर परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी मनपा प्राथमिक शाळा क्रमांक ४ कोळीवाडा पनवेल येथे भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. उपायुक्त स्वरूप खारगे ह्यांनी मनपा प्राथमिक शाळा क्रमांक ६ धाकटे खांदे पनवेल येथे भेट सदिच्छा भेट दिली तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे यांनी मनपा प्राथमिक शाळा तक्का येथे भेट दिली. या वेळी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्य पुस्तके वाटप करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या वेळी माजी नगरसेवक जयंत पगडे, अजय बहिरा उपस्थित होते.

लेखा परीक्षक निलेश नलावडे यांनी मनपा प्राथमिक शाळा पोदी येथे सदिच्छा भेट दिली. तसेच शाळेतील स्वच्छता आणि वर्ग पाहणी करण्यात आली. या वेळी माजी नगरसेवक मनोज भुजबळ आणि माजी नगरसेविका सुशीला घरत उपस्थित होते.








## सीकेटी विद्यालयात विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शाळेचा पहिला दिवस. उन्हाळी सुट्टीनंतर पहिल्यांदाच शाळेची घंटा वाजली आणि विद्यार्थी मोठ्या उत्साहाने शाळेत आले. नवी पुस्तके, नव्या वह्या, नवीन गणवेश याचा आनंद मुलांच्या चेहेऱ्यावरून ओसंडून वहात होता. सुट्टीच्या प्रदिर्घ कालावधीनंतर आपल्या शिक्षकांना आणि सोबत्यांना भेटायला मुले उत्सुक होती.

सकाळी ठीक ७ वाजता शाळेची घंटा झाली. त्यानंतर राष्ट्रगीत, प्रार्थना आणि प्रतिज्ञा व संविधान अशा क्रमाने नवीन



पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) शाळेच्या 'गायकवृंदाने' सामुहिक प्रार्थना करून वातावरण प्रसन्न केले. त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी स्वागतपर भाषणात विद्यार्थ्यांना संबोधित केले आणि नवीन शैक्षणिक वर्षाकरीता शुभेच्छा दिल्या. यंदा शाळेत ६७ हून अधिक नवीन विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाबाचे फुल व शाळेची माहिती पुस्तिका देऊन स्वागत करण्यात आले.

या वेळी सीकेटी शाळा इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका निरजा अदुरी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुलांच्या चेहेऱ्यावरील आनंद, उत्साह अशा वाताावरणात विद्यालय जणू चौतन्याने फुलुन गेले.

## उरणमध्ये पुस्तकांसह शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषद शाळा क्र. १ उरण येथे सोमवारी (दि.१६) नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला इयत्ता पहिलीत नव्याने दाखल होत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन केले होते.

यामध्ये सुरुवातीला परिसरात विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली. नंतर शाळेत विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व सर्व शिक्षकांची सभा झाली. या कार्यक्रमास उरण नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे तसेच शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता माने मॅडम उपस्थित होत्या.

नावागतांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना शासनाकडून पुरविण्यात आलेली मोफत पाठय पुस्तके, गणवेश, शूज, सॉक्स, बेल्ट, टाय इत्यादी साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शाळेचा पहिला दिवस असल्याने मुलांना आज गोड जेवण देण्यात आले.



# गव्हाण विद्यालयात नवागतांचा शालेय प्रवेशोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये नवीन शैक्षणिक वर्षातील नवागतांचा प्रवेशोत्सव उत्साहात झाला.

नवीन शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मधील शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यालयामध्ये या शैक्षणिक वर्षासाठी प्रविष्ट झालेल्या इयत्ता पाचवी व आठवी आणि इतर वर्गातील निवडक विद्यार्थ्यांच्या नवागातांचा प्रवेशोत्सव अत्यंत उत्साहात झाला.

### चेअरमन अरुणशेठ भगत यांची उपस्थिती

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी तसेच गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, महादेव कोळी आदी मान्यवरांचे हस्ते झालेल्या प्रवेशोत्सव समारंभास विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, माजी प्राचार्य गोवर्धन गोडगे, कामोठे शाखेचे माजी प्राचार्य सुरेश चाळके, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील आदींसह विद्यार्थी, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प व मिठाई भरवून विद्यालयातील महिला शिक्षकांकडून औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. दरम्यान, प्रवेशोत्सवावेळी नवागत विद्यार्थ्यांना आपल्या शाळेचा पहिला दिवस संस्मरणीय ठरावा म्हणून खास सजावटीचा सेल्फी पॉईंटच्या धरतीवर 'पिक माय पिक्चर पॉईंट' तयार करण्यात आला.

### पहिल्याच दिवशी पुस्तक वितरण

**मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण विभाग व बालभारतीच्या वतीने मोफत उपलब्ध केलेले इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील पुस्तकांचे संच वितरित करण्यात आले. विद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने या पुस्तक वितरणाचे नेटके नियोजन केले. पुस्तकांचे संच प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहताना शैक्षणिक वर्षातील त्यांच्या ज्ञानग्रहणाची क्षुधा लक्षवेधी ठरली.**



## निवडक

### पतीने पत्नीवर तलवारीने केला हल्ला

**पनवेल :** चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करणाऱ्या पतीने पत्नीवर तलवारीने हल्ला केल्याची घटना उलवे परिसरात घडली. यात महिलेच्या डोक्याला, पायाला दुखापत झाली आहे. उलवे पोलीस ठाण्यात पतीवर गुन्हा दाखल केला आहे. इम्रान खान (वय ३४) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे. काही महिन्यांपासून ते उलवेमध्ये राहण्यास आहेत. इम्रानला दारूचे व्यसन असून तो नेहमी पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करत होता. दोघांत भांडण झाले. त्याने घरात ठेवलेल्या तलवारीने तिच्यावर हल्ला केला. यामध्ये तिच्या पायाला दुखापत झाली. पत्नीने अखेर पतीविरोधात पोलिसांकडे तक्रार केली आहे.

### गरजू मुलांना वह्यांचे वाटप

**रसायनी :** गणपती देवस्थान मोहोपाडा ट्रस्टतर्फे रविवारी (दि.१५) गरजू मुलांना वह्या वाटपाचा कार्यक्रम झाला. माजी मुख्याध्यापक पाटील सर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. जपानी भाषा तज्ज्ञ अनिल सोमण, मंदिराचे अध्यक्ष सुनील सोमण, पदाधिकारी चंद्रकांत ओक, काणे, धनंजय जोशी, जयराम देशमाने हे उपस्थित होते. साधारण १०० मुले होती, त्यांना व्हाया, पेन, चॉकलेट यांचे वाटप केले. गेली २० वर्षे गणपती देवस्थान तर्फे हे सामाजिक कार्य चालू आहे.



## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये पितृ दिन उत्साहात







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे येथे जागतिक पितृ दिन निमित्ताने पूर्व प्राथमिक विभागातर्फे वडील पालकांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता ज्यामध्ये पाल्य व पालक यांच्यामधील अनोख्या नात्याचे प्रेम दिसून येईल, असे विविध खेळ व कृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरुवात पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांकडून वडिलांना गुलाब पुष्प व शुभेच्छा देऊन करण्यात आली. वडील पालकांनी आपल्या पाल्यासाठी गायन व नृत्य के सादर केले. यानंतर थम प्रिंटिंग थ्रो द बॉल इन बास्केट, बलून बॅलन्स रेस यांसारखे वडील व मुलांच्या समन्वयाचे खेळ झाले.

कार्यक्रमाची सांगता वडील पालकांनी आपल्या आठवणी व भावना व्यक्त केल्या तसेच असे कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल स्कूलचे अध्यक्ष रामशेठ ठाकूर, चेअरमन परेश ठाकूर, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाचे आभार मानले अशा रीतीने कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

# सिसमॅक कंपनीचा वर्धापन दिन उत्साहात

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिसमॅक आयटी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा २०वा वर्धापन दिन बेलापूर येथील नामांकित हॉटेल के स्टार येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली व अहमदाबाद येथे विमान दुर्घटनेतील मृत्यू पावलेल्या लोकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




या कार्यक्रमासाठी आमदार प्रशांत ठाकूर, पद्मश्री अच्युत पालव, पनवेल तालुका भाजप संघाचे अध्यक्ष भूपेंद सदानंद पाटील, टेक्नो इलेक्ट्रोनिक्सचे डायरेक्टर श्रीपाद शिंत्रे, जावेद मुलानी, रवींद्र ठोंबरे, नासीर खान, संदीप पाटील, वैभव कांबळे असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की, सिसमॅक कंपनीचे डायरेक्टर फिरोज सय्यद यांनी स्वतःचा गौरव करून न घेता २० वर्षे कंपनीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सिसमॅक हिरो २०२५ सन्मान देवून गौरव केला यातच त्यांचा मोठेपणा दिसून येतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत देश आयटी क्षेत्रात पुढे जात आहे, त्यासाठी तुमच्या या कार्याचा हातभार लागेल. तुमच्या या कार्यामुळे पनवेल व त्या आजूबाजूच्या शहरातील तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध होईल असेही सांगितले. या सर्व कार्यात काही अडचणी आल्यास मी सदैव तुमच्या पाठीशी आहे, असे त्यांनी आश्वासन दिले.

कंपनीला मिळालेल्या आयएसओ ९००१-२०१५ नामांकनाचे अनावरण आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आहे. तसेच राष्ट्रपती भवन न्यू दिल्ली येथे पद्मश्रीने सन्मानित करण्यात आलेले पद्मश्री अच्युत पालव सर यांचा सन्मान कंपनीचे डायरेक्टर फिरोज सय्यद आणि शादाब शेख यांचे वडील शाबुद्दिन सय्यद आणि गयासुद्दिन शेख यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमादरम्यान प्रशांत ठाकूर व पद्मश्री अच्युत पालव यांचा शाल, श्रीफळ आणि स्न्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच कंपनीतील विशेष कामगिरी करणाऱ्या शिलेदारांचा सिसमॅक हिरो २०२५ अवार्ड देवून गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमादरम्यान कंपनीचे डायरेक्टर फिरोज सय्यद, शादाब शेख आणि आरिफ सय्यद यांनी कंपनीच्या २० वर्षाच्या कार्याकालाबद्दल थोडक्यात आढावा सर्वांसमोर सादर केला. भाजप अल्पसंख्याक मोर्च्याचे प्रदेश उपाध्यक्ष तथा पत्रकार सय्यद अकबर यांनी फोनवरून कार्यक्रमासाठी आणि कंपनीच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सिसमॅक हिरो ऑफ द इयर २०२५ हा अवार्ड आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते अर्जुन कांबळे यांना देवून गौरविण्यात आले. श्री व सौ. मनोज पाटील आणि स्मिता पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शेवटी अर्चना कडू यांनी आलेल्या सर्व उपस्थित मान्यवरांचे आणि आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

## संपादकीय

# हे युद्ध आणखी पसरू नये

गेल्या अडीच वर्षांपासून गाझामध्ये हमासच्या विरोधात लढणाऱ्या इस्रायलने शुक्रवारी अखेर इराणवरही हल्ला चढवला. वर्षभरापासून इस्रायल इराणवर हल्ला करणार हे दिसतच होते. इराणचे अणुबॉम्ब बनवण्याचे प्रयत्न आपण यशस्वी होऊ देणार नाही अशा भूमिकेतून इस्रायलने हा हल्ला चढवला. इराणनेही त्यास आक्रमक उत्तर दिले आहे. तूर्तास दोन्ही देश मागे हटण्यास तयार दिसत नाहीत. त्यामुळेच हे युद्ध आणखी पसरू नये ही चिंता जगभराला भेडसावते आहे.

**इस्रायल आणि इराण यांच्या दरम्यान शुक्रवारी सुरू झालेला संघर्ष सोमवारी चौथ्या दिवशीही तीव्र झालेला दिसत होता. दोन्ही बाजूंनी क्षेपणास्त्र हल्ले सुरूच आहेत. दोन्ही देशांमध्ये मोठी जीवितहानी झाली असून यात सर्वसामान्य नागरिकांचे प्रमाण मोठे आहे. इस्रायलने इराणच्या संरक्षण विभागाच्या मुख्यालयावर आणि अणु कार्यक्रमाशी संबंधित ठिकाणांवर हल्ले केले आहेत, तर इराणच्या क्षेपणास्त्रांनीही इस्रायलची हवाई संरक्षण यंत्रणा भेदत अनेक इमारतींवर मारा केला आहे. इराण अणुबाँब तयार करून आपल्यावर हल्ला करेल ही शक्यता गृहित धरून इस्रायलने इराणवर हल्ले सुरू केले. आपला अणुऊर्जा कार्यक्रम शांततेच्या उद्देशाने आहे. आपण कधीही अण्वस्त्रे विकसित करण्याचा किंवा मिळवण्याचा प्रयत्न केलेला नाही असा दावा इराणने यापूर्वी केला आहे. अणुऊर्जा हा आपला हक्क असल्याचे इराणचे म्हणणे आहे. परंतु इराणच्या आण्विक कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय संस्थांची मान्यता नाही. तरीही आंतरराष्ट्रीय दबाव धुडकावून इराणने आण्विक कार्यक्रम सुरू ठेवला आहे. या अणुकार्यक्रमाबद्दल अमेरिकेच्या इराणशी वाटाघाटी सुरू होत्या. पण रविवारी अमेरिका व इराणदरम्यान ओमान येथे होणार असलेली अणुकरार चर्चा इराणने रद्द केली. दरम्यान, आपण इराण आणि इस्रायल यांच्यात शस्त्रविराम घडवू असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. परंतु तूर्तास तरी दोन्ही बाजू माघार घेण्यास तयार दिसत नाहीत. इस्रायलचे हल्ले अमेरिकेच्या मदतीनेच आहेत अशी इराणची भूमिका आहे तर इराणने अमेरिकेविरोधात आगळीक केल्यास अमेरिका ठोस प्रत्युत्तर देईल असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. अमेरिका युद्धात उतरल्यास युद्धाचा भडका पश्चिम आशियाभरात पसरू शकतो अशी भीती आहे. इस्रायलचे आयर्न डोम आणि रो यंत्रणा ही त्यांच्या संरक्षण व्यवस्थेचा कणा मानली गेली आहे. परंतु इराणने आक्रमकतेने इस्रायलचे पोलादी आच्छादन भेदून क्षेपणास्त्रे डागली आहेत. इराण इस्रायलच्या विरोधात दहशतवाद्यांना बळ देत असल्याचे इस्रायलचे म्हणणे आहे. यापूर्वी इस्रायलच्या गाझा पट्टीतील कारवाईत लहान मुले व महिलांसह जवळपास ५५ हजार लोक मृत्यूमुखी पडल्याचे सांगितले जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देश अलीकडच्या काळात त्या विरोधात भूमिका घेत आहेत. इस्रायलने गाझामध्ये शस्त्रसंधी जाहीर करावी अशा आशयाच्या संयुक्त राष्ट्रातील ठरावाच्या बाजूने १४९ देशांनी मतदान केले तर १८ देशांनी तटस्थ राहणे पसंत केले. यात भारताचाही समावेश होता. भारताच्या तटस्थतेवर काँग्रेस पक्षाने टीका केली असली तरी आजच्या जागतिक परिस्थितीत आपल्या राष्ट्रहिताला प्राधान्य देऊन भारताने ही संतुलित भूमिका घेतली आहे. इस्रायल आणि इराण या दोन्ही देशांनी वाटाघाटींद्वारे संघर्षातून मार्ग काढण्याची गरज आहे. परंतु दोन्ही देश सध्या त्यास तयार दिसत नाहीत. याही युद्धाची किंमत अवघ्या जगाला चुकवावी लागणार आहे.**

# महाड पालिकेची नालेसफाई, खड्डे भरण्याची कामे कागदावरच!





**खबरबात**
**महेश शिंदे**

महाड नगरपालिकेकडून सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील नालेसफाई आणि खड्डे भरण्याची प्रक्रिया कागदावरच पूर्ण केली आहे. यामुळे शहरात जागोजागी पाणी साचत असून खड्ड्यांमधून नागरिकांना वाट काढत जावे लागत आहे. तर घरातील नाले देखील सफाई न केल्यामुळे गटारामध्ये पाणी तुंबून राहत आहे.

ऐतिहासिक महाड शहरांमध्ये बहुतांश रस्ते दहा वर्षांपूर्वी सिमेंट काँक्रीट मध्ये करण्यात आलेले आहेत. तर जोड रस्ते आणि इतर रस्ते सध्या काँक्रीट मध्ये करण्यात आले. मात्र जुन्या काँक्रीट रस्त्यांवर खड्डे पडले असल्याने खड्ड्यांमधून पाणी साचून राहत आहे. त्यातच महाड नगरपालिकेकडून सध्या अंतर्गत नाले आणि पिण्याच्या पाण्याच्या लाईनची कामे सुरू आहेत. या कामांकरता जागोजागी खोदकाम करण्यात आलेले आहे. सदर काम पूर्ण होण्यास पुढील किमान दोन वर्षे तरी लागतील असा अंदाज असल्याने खड्डे पडलेल्या रस्त्यांवर दुरुस्ती करण्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक टाळण्यात आले आहे. तर पावसाळ्यापूर्वी खड्डे भरण्याची कामे करणे अपेक्षित असताना देखील पालिकेच्या सुस्त अधिकाऱ्यांमुळे ही कामे करण्यात आलेली नाहीत.

शहरातील बहुतांश रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असून अंतर्गत आणि जोड रस्त्यांवर येण्याच्या पाण्याच्या लाईनचे काम सुरू असल्याने केलेल्या खोदकामामुळे खड्डे पडून पाणी साचून राहिले आहे. रस्त्यांवरील पाणी गटारामध्ये जाण्यासाठी पावसाळ्यापूर्वी उपाययोजना करणे अपेक्षित असताना देखील कोणत्याच प्रकारची कामे मे महिन्यामध्ये करण्यात आलेली नाहीत. यामुळे खड्ड्यात साचलेल्या पाण्यामुळे खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने अपघाताची देखील शक्यता आहे. उभा मारुती ते कोटेश्वरी कडे जाणाऱ्या रस्त्यावर खड्डेच खड्डे तयार झाले आहेत वारंवार तक्रार करून देखील अद्याप खड्डे बुजवण्यात आलेले नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. हीच अवस्था शहरातील अनेक रस्त्यांवर असल्याने वाहन चालकांना त्रास होत आहे.

महाड शहरांमधून पावसाळ्यापूर्वी नालेसफाई केली जाते यावर्षी मे महिन्यातच पाऊस सुरू झाल्याने नालेसफाई अद्याप करण्यात आलेली नाही. जागोजागी नाल्यांमधून अनेक ठिकाणी कचरा साचून राहिला आहे. यामुळे गटार आणि नाल्यातील पाणी पुढे सरकत नसल्याने हे सांडपाणी गटारा मधून साचून राहत आहे. यामुळे पावसाळ्यात डासांचा देखील त्रास वाढला आहे. पालिका प्रशासनाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करून आहेत. शहरात विविध ठिकाणी रस्ते, नाले, आणि बगीच्यांची दुरुस्तीची कामे सुरू असल्याने या अधिकाऱ्यांना नागरिकांच्या समस्यांकडे लक्ष देण्यासाठी वेळ नसल्याचे दिसून येत आहे. शहरातील विविध ठिकाणी अशा प्रकारे पाणी साचून राहत असल्याने वाहन चालकांना देखील त्रास होत असून या खड्ड्यांतून जाणाऱ्या वाहनांमुळे पादचार्यांवर देखील पाणी उडण्याचे प्रकार घडत आहेत. या सुस्त अधिकाऱ्यांवर कारवाई अपेक्षित आहे.

# श्रीवर्धनच्या शेतीची आशा, आव्हाने आणि संघर्ष

श्रीवर्धन तालुक्यात समाधानकारक पावसाला सुरुवात होताच शेतकऱ्यांनी भात व नाचणीच्या पेरणीला वेग दिला आहे. चार कृषी सेवा केंद्रांवर २०१ क्विंटल भात बियाणे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले असून, नाचणी बियाण्याचीही मागणीप्रमाणे पुरवठा सुरू आहे. या वर्षी तालुक्यात १४०३ हेक्टर क्षेत्रावर भात व ८४ हेक्टरवर नाचणीची लागवड होणार आहे.




श्रीवर्धन तालुका नारळ, सुपारी व आंबा यांसारख्या बागायती पिकांसाठी ओळखला जातो. मात्र खरी हक्काची शेती ही भात व नाचणीचीच. काळीभोर माती व दमट हवामान या पारंपरिक पिकांसाठी अतिशय अनुकूल आहे. अनेक प्रयोगशील शेतकरी वर्षानुवर्षे विविध जातींचे भात पेरत असून, स्थानिक जमिनीच्या गुणधर्मानुसार उत्पादनही चांगले मिळत आहे.आजच्या यांत्रिक युगातही श्रीवर्धनचा बळीराजा आपल्या नांगरणीसाठी बैलजोडीवरच अवलंबून आहे. यामुळे नैसर्गिक शेतीला चालना मिळते, परंतु कामगार टंचाई व वाढती मजुरी शेतकऱ्यांना कोंडीत पकडत आहे. यावर्षी ७०% शेतकऱ्यांनी नवीन बी-बियाणे खरेदी केली असून, उर्वरित ३०% शेतकऱ्यांनी मागील वर्षीचेच बियाणे वापरले आहे.

भातशेतीसाठी लागणारा मनुष्यबळ, वाढलेली मजुरी, आणि बाजारात हमीभावाचा अभाव यामुळे शेतकऱ्यांच्या नफ्यात सातत्याने घट होत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी शेतीस नफा न मिळाल्यास जमिनी विकण्याचा पर्याय शोधू लागले आहेत. परिणामी भातशेतीच्या अस्तित्वावरच संकट उभं राहतंय.

तालुक्यातील चार कृषी सेवा केंद्रे शेतकऱ्यांसाठी बियाणे, खत, औषधे व सल्ला यांचं मार्गदर्शन देत आहेत. या केंद्रांमुळे पेरणीस वेग मिळाला असून, योग्य नियोजन झाल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ शक्य आहे.

आजचा बळीराजा पारंपरिकतेला चिकटून राहूनही नव्या तंत्रज्ञानाकडे पाहतोय. त्याला गरज आहे ती योग्य दर, भरवशाच्या बाजारपेठा आणि सरकारी मदतीची. जर वेळेत उपाययोजना झाली नाही, तर श्रीवर्धनची समृद्ध भातशेती इतिहासजमा होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.


बळीराजा हा केवळ शेतकरी नाही, तो संस्कृतीचा कणा आहे. त्याच्या कष्टांची फळं संपूर्ण समाज उपभोगतो. त्याच्या अस्तित्वासाठी ठोस धोरणं आणि सहकार्याची नितांत गरज आहे. **–भारत चोगले**



## बदलते तंत्रज्ञान

# जनरेटिव्ह एआयमधील व्हेक्टर डेटाबेस प्रणाली

व्हेक्टर डेटाबेस ही एआयमधली आणि त्यातही खास करून नवनिर्मितीक्षम एआय (म्हणजे जनरेटिव्ह एआय) मधली अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. अलीकडच्या काळात व्हेक्टर डेटाबेसविषयीची माहिती असलेल्या लोकांची गरज मोठ्या प्रमाणावर भासते. साहजिकच या संदर्भातली कौशल्यं शिकणं उपयोगी ठरणार आहे.



आपण यावेळी या तंत्रज्ञानाची तोंडओळख करून घेणार आहोत. यासाठी आपण मुळात 'डेटाबेस' या शब्दाचा विचार करू. डेटाबेस हा शब्द तसा खूप जुना आहे. गेली जवळपास पाच दशकं डेटाबेसची संकल्पना संगणक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. माहिती साठवण्यासाठी आणि हवी तेव्हा ती मिळवण्यासाठी डेटाबेसचं तंत्रज्ञान वापरलं जातं. उदाहरणार्थ जेव्हा बँकेचा खातेदार आपल्या खात्यात काही रक्कम भरतो तेव्हा त्यासाठीची माहिती डेटाबेसमध्ये साठवली जाते तसंच जेव्हा खातेदार आपल्या खात्यात आता किती रक्कम शिल्लक आहे हे तपासतो तेव्हा याच डेटाबेसमधून ही माहिती मिळवली जाते.

अशा प्रकारचा डेटाबेस सर्वसामान्य प्रकारच्या कामांसाठी वापरणं शक्य असतं. एआयसाठी मात्र तो योग्य ठरत नाही. याचं कारण म्हणजे एआयमध्ये माहिती शोधण्यासाठी शब्दांमधला, वाक्यांमधला, मजकुरांमधला परस्परसंबंध शोधणं आणि त्याआधारे माहितीचे दुवे जोडून विचारलेल्या प्रश्नाला उत्तरं देणं गरजेचं असतं. अशा प्रकारे माहिती शोधण्याच्या संकल्पनेला अर्थपूर्ण किंवा शब्दार्थांशी संबंधित असलेला शोध म्हणजे 'सिमँटिक सर्च' असं म्हणतात. यासाठी नेहमीचा डेटाबेस तसा कुचकामी ठरत असल्यामुळे आपल्याला इथे व्हेक्टर डेटाबेस वापरावा लागतो.

व्हेक्टर डेटाबेसचं तंत्रज्ञान अवगत असलेल्या लोकांना एआयमध्ये चांगली मागणी असते. अर्थात, एआयमधल्या इतर अनेक कौशल्यांचीही संबंधित माणसाला चांगली ओळख असणं आवश्यक आहे. पाइनकोन, क्रोमा, विव्हिएट, मिल्व्हस अशी व्हेक्टरडेटाबेसची अनेक रुपं बाजारात उपलब्ध आहेत. पाइनकोन वगळता सगळे ओपन सोर्स म्हणजे वापरायला फुकट आहेत. त्यापैकी क्रोमाची लोकप्रियता सगळ्यात जास्त आहे.

# शिवरायांना घडवणाऱ्या राजमाता जिजाबाई



**निमित्त**

महाराष्ट्राच्या इतिहासातील त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे; कारण त्या केवळ स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर दीनदुबळ्यांच्या, रयतेच्या मातोश्री होत्या. त्यांचे मूळ घराणे सिंदखेडच्या जाधवराव देशमुखांचे, सुखवस्तू शूर जहागीरदारांचे होते. वडील लखूजी जाधव हे निजामशाहीतील मातब्बर सरदार होते. त्यांच्या चाकरीत असलेले मालोजी भोसले यांचे चिरंजीव शहाजी यांच्याशी इ. स. १६०९–१० दरम्यान दौलताबाद किल्ल्यात जिजाबाईंचा विवाह झाला. जिजाबाई व शहाजीराजे यांचा मुक्काम सुरुवातीस काही वर्षे वेरूळातच होता. पुढे शहाजी आपला मोकासा (जहागिरी) सांभाळून निजामशाहीच्या नोकरीत रुजू आले. त्या वेळी जिजाबाईंची त्यांच्यासोबत भ्रमंती चालू होती.

जिजाबाईंना एकूण सहा मुले झाली. त्यांपैकी संभाजी व छ. शिवाजी ही दोन मुले इतिहासात प्रसिद्ध असून अन्य चार मुले अल्पायुषी ठरली. पुढे शिवाजी महाराजांचे थोरले बंधू संभाजी यांना अफजलखानाच्या कपटाने मृत्यू आला (१६५४). जिजाबाई शहाजीराजांच्या पुण्याच्या जहागिरीत इ. स. १६३६ पूर्वीच रहावयास आल्या. पुण्याच्या मुक्कामात त्यांनी बाल शिवाजींना लष्करी शिक्षणाबरोबर रामायण, महाभारत, भागवत आदींतील कथा सांगितल्या. विशेषत: शांतिपर्वातील राजकीय विचार आणि महाभारत युद्ध यांतील कथा सांगितल्या. जिजाबाईंनी विश्वासू सरदारांच्या मदतीने पुणे जहागिरीची उत्तम व्यवस्था लावली. पुण्यात लालमहाल प्रासाद बांधला, ओसाड जमीन लागवडीखाली आणली. त्यांनी कसबा पेठेतील गणपतीची पूजाअर्चा नियमित सुरू केली. इतर मंदिरांतूनही दिवाबत्तीची व्यवस्था केली; तसेच खेड–शिवापूर येथे एक वाडा बांधला. तेथे शहाबाग नावाची उत्तम बाग तयार केली. शहाजींच्या राजकारणाचे, धोरणांचे त्यांना ज्ञान होते. पुणे प्रांताच्या राज्यकारभारातील बारीकसारीक गोष्टींत लक्ष घालून त्यांनी अनेक वेळा न्यायनिवाडे केले. याविषयींचे अनेकविध उल्लेख तत्कालीन पत्रव्यवहारांतून पहावयास मिळतात. राजगडावर त्यांचा मुक्काम असताना खंडोबाच्या जेजुरी येथील मार्तंडभैरव मंदिराच्या गुरवपणाविषयी तंटा निर्माण झाला. त्याचा निवाडा जिजाबाईंनी केला होता. त्यावर 'मातोश्री साहेबे (जिजाबाईंनी) जे आश्वासन दिले आहे, तसेच माझेही आश्वासन राहील', असे दि. १३ जुलै १६५३ च्या पत्रात शिवाजी महाराज म्हणतात. शिवाजी महाराज मातोश्रींच्या निर्णयास विरोध करत नसत. जिजाबाई महाराजांच्या राज्यकारभारात अखेरपर्यंत (१६७४) जातीने लक्ष घालीत असल्याचे प्रकर्षाने जाणवते. राज्यकारभारात शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत त्या राज्याची सर्व जबाबदारी सांभाळत असत. महाराज आग्राभेटीवर गेले असता त्यांनी सर्व कारभाराचा शिक्का जिजाबाईंच्या हाती सुपुर्द केला होता आणि त्यांना सहकार्य करण्याचे अभिवचन विश्वासू कारभाऱ्यांकडून घेतले होते. जिजाबाई स्वाभिमानी, धाडसी, करारी, दृढनिश्चयी आणि स्वतंत्र वृत्तीच्या होत्या. छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर बारा दिवसांनी त्यांचे पाचाड (रायगड) येथे निधन झाले. **(साभार : मराठी विश्वकोश)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# मका वजन कमी करण्यासाठी खरंच फायदेशीर आहे का?

मका खाण्याचे अनेक पौष्टिक फायदे आहेत. त्याच्या पौष्टिक मूल्यामुळे आणि अन्न उद्योगात इतर अनेक उपयोगांमुळे मका हा जगातील सर्वात महत्त्वाच्या पिकांपैकी एक आहे. पारंपरिकपणे भारतातील अनेक पदार्थांमध्ये मका वापरला जातो.



फेरुलिक आम्ल हे एक अद्वितीय फायटोकेमिकल आहे, जे बहुतेक धान्यांमध्ये तसेच फळे आणि भाज्यांमध्ये आढळते, परंतु ते मक्यामध्ये जास्त प्रमाणात आढळते. मका शिजवल्याने फेरुलिक आम्लाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढते. जरी कॉर्न कॅरोटीनमुळे पिवळा असला, तरी त्यात बीटा–कॅरोटीनचे प्रमाण कमी असते. कॅरोटीन्स ऑक्सिडेटिव्ह प्रतिक्रिया आणि कर्करोग रोखण्यास मदत करतात.

मक्यात कार्बोहायड्रेट्स, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. मका हे एक चांगले प्रोबायोटिक आहे. याच्या सेवनाने पचनास मदत होते, शिवाय चांगले चयापचय सुलभ करतात, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. त्यात अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे ए, बी आणि सीदेखील असतात, जे निरोगी त्वचा, दृष्टी आणि त्वचा सुदृढ राखण्यास मदत करतात. शिवाय त्यात झिंक, मॅग्नेशियम, तांबे, लोह आणि मँगनीजसारख्या काही आवश्यक खनिजांचे निरोगी प्रमाण असते. मका हे ग्लूटेन–मुक्त धान्य आहे आणि ते सेलिआक रोगासाठी वापरले जाते. वजन कमी करण्यास मदत करण्याव्यतिरिक्त ते दैनंदिन चयापचयसाठी आवश्यक कॅलरीज प्रदान करते, असे बंगळुरू येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या मुख्य आहारतज्ज्ञ रिंकी कुमारी म्हणाल्या.

**आहारात मक्याचा समावेश करण्याचे फायदे**

मक्यामध्ये कार्बोहायड्रेट्स आणि पोटॅशियम, फॉस्फरस, लोह आणि थायामिनसारखी खनिजे आणि जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात.

आहारातील फायबरची कमतरता बद्धकोष्ठता, कर्करोग, उच्च कोलेस्ट्रॉल, मधुमेह, लठ्ठपणा आणि उच्च रक्तदाबाशी जोडली गेली आहे. कॉर्नमीलमध्ये १५% फायबर असते, ज्यापैकी नऊ टक्के विरघळणारे असते.


मक्याचा ग्लायसेमिक इंडेक्स बराच जास्त असतो आणि म्हणूनच मधुमेही आणि वजनाची जाणीव असलेल्या लोकांनी ते कमी प्रमाणात घ्यावे.

ग्लुटेन–मुक्त असल्याने ते ग्लुटेन असहिष्णुता किंवा सेलिआक रोग असलेल्या लोकांसाठी योग्य आहे.

# रायगड किल्ल्यावर शिवप्रेमी आणि पर्यटकांची गर्दी

## रोप वेवर ताण, पार्किंगही फुल्ल!





**महाड : प्रतिनिधी**

सलग सुट्ट्या लागल्याने किल्ले रायगडावर पर्यटक आणि शिवप्रेमिंची गर्दी उसळली आहे. यामुळे रायगड रोपवेला सुमारे चार ते पाच तासांची प्रतीक्षा असल्याने पायी जाणाऱ्यांची संख्यादेखील अधिक आहे. रायगड पायथा येथे वाहनांची पार्किंग करण्यास देखील जागा उरलेली नाही. रायगड रोपवे ते रोपवे फाटा, रोपवे फाटा ते चित्त दरवाजापर्यंत दुतर्फा वाहनांच्या रांगात रांगा लागल्या आहेत. यामुळे या परिसरामध्ये वाहन तळाची सुविधा होणे काळाची गरज असल्याची मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

महाराष्ट्राची अस्मिता असलेला रायगड किल्ला, राजमाता जिजाऊंचे समाधीस्थळ असलेले पाचाड परिसराचा सद्या मोठ्या प्रमाणात विकास होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे शिवप्रेमी आणि पर्यटक मोठ्या संख्येने गडावर येतात. यापूर्वी पावसाळ्यात रायगडावर पर्यटक आणि शिवप्रेमी येणे बंद असायचे मात्र आता गडावर पर्यटक पावसाळ्यात देखील दाखल होऊ लागले आहेत. रायगड पाहण्यास पर्यटकांनी एकच गर्दी केल्यामुळे पाचाड पासून वाहनांच्या रांगा लागल्या असून चित्तदरवाजा येथे वाहने पार्किंग करण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. रायगड रोपवे ला सुमारे चार तासाची प्रतीक्षा असल्याने पायी जाणाऱ्यांची संख्या देखील वाढली आहे. यामुळे चित्त दरवाजा येथे पर्यटकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

गेली काही वर्षात याठिकाणी करोडो रुपयांची कामे केली जात असतानाच मूलभूत सुविधांकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे. पार्किंग साठी प्राधिकरणाने जागा संपादन करून त्याठिकाणी वाहन तळाची सुविधा उपलब्ध करून देणे आहे. मात्र याबाबत अद्याप कोणताच निर्णय झालेला दिसून येत नाही. महाड रायगड मार्गाचे रुंदीकरण झाले असले तरी पाचाड रोपवे फाटा ते चित्त दरवाजा इथपर्यंतचा मार्ग अद्याप अरुंद आहे. यामुळे याठिकाणी दुतर्फा वाहन पार्क केल्या जात आहेत. चित्त दरवाजा याठिकाणी वाहतूक कोंडी होत असल्याने किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या गावांमध्ये जाणाऱ्या एस टी महामंडळाच्या बसेस देखील अडकून पडत आहेत. याचा फटका स्थानिक ग्रामस्थांना बसत असून अनेकवेळा पायी चालत जाण्याची वेळ नागरिकांवर येत आहे.

शासकीय स्तरावर वाहन तळाची सुविधा नसल्याने याठिकाणी खाजगी वाहन तळ सुरू झाले आहेत. शासनाला कोणत्याच प्रकारचा महसूल न देता सुरू करण्यात आलेल्या खाजगी वाहन तळ मालकांकडून वारेमाप पैसे उकळले जात आहेत. यामुळे शिवप्रेमी नाराजी व्यकत्व करत आहेत.

**प्रतिदिन किल्ले रायगडावर शेकडो बसेस आणि छोटी वाहने येत आहेत. ही वाहने पार्क करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.रायगडाचा आणि परिसराचा विकास झपाट्याने होत असला तरी शासनाचे मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष आहे. याठिकाणी संपादित जागेत किंवा टी पॉईंट जवळ वाहन तळाची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे. यामुळे पर्यटक आणि शिवभक्तांची गैरसोय होणार नाही**

**– सिराज सय्यद, स्थानिक व्यावसायिक**

# माणगावमध्ये शिक्षकाकडून मुलाला जि.प. शाळेत प्रवेश

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील प्राथमिक शिक्षक दत्ताराम शिर्के यांनी आपला मुलगा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विकास कॉलनी या शाळेत इयत्ता पहिलीमध्ये दाखल करून इतर सरकारी कर्मचाऱ्यांनी आपलाही मुलगा किंवा मुलगी जिल्हा परिषदेमध्ये दाखल करून घ्यावी असा आदर्श घालून दिला आहे.



श्री. व सौ. शिर्के ते दोघेही सरकारी नोकर असून आपलाही पाल्य आपल्या सरकारी शाळेत शिक्षण घेतलं पाहिजे या उदात्त हेतूने प्रेरित होउन त्यांचा चिरंजीव चित्रांश याला पहिलीमध्ये दाखल केले. त्यांचा मोठा मुलगा प्रबोध असाच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकून या वर्षी दहावी बोर्ड परीक्षेत ९८.२० गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे.

इतर सरकारी कर्मचारी यांनी यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या मुलाला किंवा मुलीला सरकारी शाळेत दाखल करून जिल्हा परिषदेच्या शाळेतील घटणारी पटसंख्या थांबवू शकतील हीच अपेक्षा जनसामान्यांकडून व्यक्त होताना दिसत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांमुळे मुलावर उपचार

**कर्जत : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरांमुळे मला उपचार मिळाले. त्यांनी केलेल्या मदती मुळेच स्वतःच्या पायावर उभा राहू शकलो. मला एकदम भारी वाटतय.' असे भावनावश उदगार वेदांत ठाकरे याच्या मुखातून निघाले.



रायगड जिल्ह्यातील कर्जत मधील सामान्य कुटुंबातील वेदांत ठाकरे ( १५ वर्ष ) इतर मुलांप्रमाणेच खेळण्या–बागडण्याच्या, दंगा–मस्ती करण्याच्या वयात वेदांत अंथरूणाला खिळलेला होता. अनुवंशीकतेने तो थॅलेसेमिया सारख्या दुर्धर आजाराशी अवघ्या ६ महिन्याचा असल्यापासून सामना करत होता. थॅलेसेमियाचे उपचार महाग असल्यामुळे त्याच्या आईवडिलांना चांगल्या हॉस्पिटलमध्ये नेऊन उपचार करणं शक्य नव्हतं. पण देव तारी त्याला कोण मारी असं म्हणतात ना ! तसेच झाले.

मुलाच्या उपचाराच्या विवंचनेत असतानाच भाजप कार्यकर्त्यांच्या माध्यमातून ही बाब तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पर्यंत पोहोचली आणि या 'देव'दूताच्या माध्यमातून त्याचे भाग्यच बदलले. देवाभाऊंनी त्याच्या उपचारांसाठी तत्काळ ४० लाख रुपयांची मदत केली आणि नवी मुंबईतील एमजीएम या नामांकित रुग्णालयात उपचारही सुरु झाले. देवाभाऊंनी तत्काळ केलेल्या मदतीमुळे आज हा वेदांत स्वत:च्या पायावर उभा राहू शकला.

# शार्लोट तलाव येथे सुरक्षा रक्षक हवेत

**माथेरान : बातमीदार**

पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानच्या शार्लोट तलाव याठिकाणी पूर्वीप्रमाणे सुरक्षा रक्षक तैनात करण्याची मागणी माथेरानवासीयांकडून जीवन प्राधिकरणाकडे केली जात आहे.रविवार ( दि. १५) शार्लोट तलावात तीन तरुण बुडल्याची घटना घडली असून शार्लोट तलाव येथील संपूर्ण परिसरात पूर्वी प्रमाणे सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरान पर्यटनस्थळी आता बाराही महिने पर्यटकांची रेलचेल असते. यामध्ये आता मागील काही



वर्षांपासून पावसाळी पर्यटन जोर धरू लागले असून पावसाळ्यात विकेंडला पर्यटकांची मांदियाळी पाहावयास मिळते. पावसाळ्यात शार्लोट तलाव परिसरात पर्यटक मोठ्या संख्येने जात असतात तलाव परिसरात कोणीही सुरक्षा रक्षक नसल्याने येथे पर्यटक पाण्यात उतरण्याचे धाडस करतात.

रविवार दि१५ रोजी सायंकाळी काही तरुण पर्यटक तलावात मध्ये पोहण्यासाठी उतरले पाण्याचा अंदाज नसल्याने तीन पर्यटक तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना याठिकाणी घडली. पूर्वी सारखे सुरक्षा रक्षक या ठिकाणी तैनात असते तर असा अनुचित प्रकार घडला नसता. यासाठी जीवन प्राधिकरणाने माथेरान शारलोट तलाव परिसरात पूर्वीप्रमाणे सुरक्षा रक्षक उभे करावे अशी मागणी आता माथेरानवासीयांकडून केली जात आहे.



अलिबाग : जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नवगाव शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत केले.




अलिबाग : जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी कुरूळ येथे विद्यार्थ्यांचे स्वागत केले.





अलिबाग : वेश्वी येथील शाळेत रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी विद्यार्थ्यांचे आनंदाने स्वागत केले. यानंतर त्यांच्या हस्ते येथे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप झाले.


## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**

**जाहीर सुचना**

उप आयुक्त (आरोग्य विभाग), पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकरीता ट्री गार्ड पुरविणे या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता खाली नमूद केलेल्या बाबीकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | दर चौ.फूट (जी.एस.टी सह) |
|---|---|---|
| १ | ट्री गार्ड (Tree guard) Material - wooden | रु.......... |

१) सीलबंद दरपत्रके दि. २०/०६/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात स्विकारण्यात येतील.

२) प्राप्त झालेली दरपत्रके शक्यतो दि. २०/०६/२०२५ रोजी दुपारी १.३० (शक्यतो) वाजता उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

३) अटी व शर्ती युक्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र.२६३/२६५/२०२५
दिनांक :– १६/०६/२०२५

**सही/–**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे कि, मौजे - नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथील रेव्हेन्यु रेकॉर्ड मध्ये खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार **हनुमान हिरा पाटील (खाते क्र.२०६)** यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत**

| अनु क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्रफळ (हे-आर-प्र.) | आकार (रु.-पै.) |
|---|---|---|---|
| १. | ७५/१+२+३/ब (खाते क्रमांक २०६) | ०-२३-० | ४-६२ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचे कोणत्याही प्रकारचे तारण, गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर कोणत्याही प्रकारचे इजमेन्ट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, भाडेकरू पणाचा हक्क, साठेकरार, कुळमुखत्यारपत्राने करार, मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तिंनी, इतर वारसांनी वा संबंधितानी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, आक्षेप, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती, आक्षेप, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०६/२०२५
ठिकाण : पनवेल

**मार्फतः**
**ॲड. दीपा बिष्ट,**
द्वारा तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४०, ऑगस्ट क्रांती मार्ग,
शालिमार हॉटेल समोर, केम्स कॉर्नर, मुंबई - ४०००२६.
ई-मेल: adv.deepabisht@gmail.com


# रातवड विद्यालयात नवगतांचे स्वागत व पाठ्यपुस्तक वितरण

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी शैक्षणिक वर्षे २०२५–२६ मधील नवगतांचे स्वागत व मोफत पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम सोमवार रोजी उत्साहात साजरा करण्यात आला प्रथम दिनाचे औचित्य साधून नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करुन मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.




## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १९/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पेण- अलिबाग प्रदेश आणि नागोठणे औद्योगिक क्षेत्राच्या पाणीपुरवाठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........ अशुद्ध जलउदंचन केंद्रा मधील विद्यमान प्रणालीची परस्पर सुसंगततेचा पुरवठा करून पाणी उचल व्यवस्था अधिक तीव्र करणे. | ₹ ३९,९६,५२८.०० |
| २. | महाड धरण साइट पोलादपूर येथील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....... पोलादपूर येथे लघुदाब विज वितरण पॅनेल, स्टार्टर पॅनेल व अनुषंगिक उपकरणांचा पुरवठा करून बसविणे व कार्यान्वित करणे. | ₹ ३९,३७,८९५.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १९/०६/२०२५ ते दिनांक ०३/०७/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामांबाबत दिनांक २३/०६/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा उपरोक्त दिनांक २५/०६/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# लोटस तलाव वाचवण्यासाठी पर्यावरणप्रेमी एकवटले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर व वनमंत्री गणेश नाईक यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना केलेल्या दूरध्वनीनंतरही ठेकेदाराने मनमानी करत लोटस तलावात १०० ट्रक भराव टाकण्याचे काम केले होते. त्यामुळे सिडकोच्या पर्यावरण नष्ट करण्याच्या कृती विरोधात व लोटस तलाव वाचवण्यासाठी सलग दुसऱ्या रविवारी (दि.१५) विविध पर्यावरणप्रेमी सामाजिक संघटना, नागरीक, लोकप्रतिनिधी यांनी सकाळी ७ वाजता एकत्र येत लोटस तलाव वाचवण्याचा निर्धार केला.

'पर्यावरण टिकवा, लोटस लेक वाचवा' अशा घोषणा देत रस्त्यावरील व कायदेशीर लढाई अखेरपर्यंत लढण्याचा निर्धार मोठ्या प्रमाणात उपस्थित पर्यावरण प्रेमींनी केला. यावेळी नवी मुंबईतील वाशी, खारघर, बेलापूर, नेरूळ, सीवूड्स अशा विविध विभागातून पर्यावरण प्रेमी व नागरिक उपस्थित होते. सिडकोचा लोटस तलाव बुजवून पर्यावरणाची हानी करत टोलेजंग इमारती उभारण्याचा डाव हाणून पाडण्याचा निर्धार असला तरी अखेरपर्यंत लढा देऊन लोटस तलाव वाचवणारच असा निश्चय करण्यात आला.

आज रविवारी सकाळी ७ वाजता सेव्ह नवी मुंबई एन्हवायरमेंट, मँग्रोज सोल्जर, सजग नागरीक मंच, सेव्ह लोटस लेक, सीवूड्स दारावे मित्र मंडळ, विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधी, वकील यांच्यासह विविध



पर्यावरणप्रेमी लोटस तलाव वाचवण्यासाठी व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवण्यासाठी सीवूड्स सेक्टर २७ येथील लोटस लेक येथे एकत्र आले होते. सिडकोने मुजोरी करत पर्यावरणाची हानी करत लोटस तलाव नष्ट करण्याचा घाट घातला असून नवी मुंबईतील विमानतळाच्या कामातील रायगड जिल्ह्यातील भराव नेरूळ सेक्टर २७ येथील लोटस तलावात टाकण्यात आला आहे. पर्यावरणप्रेमी, लोकप्रतिनिधी व पालिकेच्या सहकार्याने सध्या तलावात भर टाकण्याचे काम थांबले असले तरी पर्यावरण प्रेमींनी तलावात टाकलेला भराव काढून घ्यावा याची मागणी केली आहे.

सध्या तलावातील भराव टाकण्याचे काम थांबवले असले तरी लोटस तलाव बुजवण्याचा सिडकोचा इरादा आहे. लोटस तलाव हा पाणथळ तलाव म्हणून उल्लेखित असतानाही सिडको शहरातील निसर्ग संपवण्याचा प्रयत्न करत आहे असा राग पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केला. सिडको सहव्यवस्थापकीय संचालक यांना लोटस तलाव बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव असून टीआयपीएल कंपनीने जवळजवळ १०० डंपर भराव तलावात टाकले असून तो भराव सिडकोने परत काढून घ्यावा अशी मागणी केली आहे. लोटस तलाव पाणथळ तलाव असताना सिडकोने मनमानी करत भराव टाकला आहे. त्यामुळे रविवारी (दि.१५) सकाळी ७ वाजता सिडकोविरोधात आंदोलन करण्यात आले.

**नवी मुंबई शहरातील नैसर्गिक सौंदर्य संपवण्याचा प्रयत्न सिडकोचा आहे. त्यामुळे एकजुटीने सिडकोविरोधात कायदेशीर व रस्त्यावरील लढाई लढण्याचा पर्यावरणप्रेमींचा निर्धार कायम आहे.**
**–तरीन मिथेल, पर्यावरणप्रेमी खारघर**

**सीवूड्समधील लोटस तलाव वाचवण्यासाठी नवी मुंबईतील विविध विभागातून पर्यावरणप्रेमी एकत्र आले होते. त्यामुळे लोटस तलाव वाचवण्याचा लढा हा यापुढील काळात अधिक तीव्र होणार आहे. पर्यावरणप्रेमी स्वतःहून पुढे येऊ लागले आहेत ही आनंदाची बाब आहे.**
**–श्रुती अग्रवाल, सेव्ह, नवी मुंबई एन्व्हायरमेंट**

# आर्थिक अडचणीमुळे तरुणीची आत्महत्या

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कुटुंबाची जबाबदारी पेलण्यासाठी केवळ राज्यातूनच नाही, तर परराज्यातून लोक मुंबईत येत असतात. उत्तर प्रदेशातील कानपूरहून एक तरुणी मुंबईमध्ये नोकरीसाठी आली होती. ती एका कंपनीत कर्मचारी म्हणून रुजू झाली, पण तिचा अपेक्षाभंग झाल्याने तिने आत्महत्या केली. तिचे नाव नंदिनी (वय २२) असे आहे. तिने आर्थिक चणचणीतूनच आपले जीवन संपवले. ही घटना नवी मुंबईतील ऐरोलीत घडली आहे.

नंदिनीच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची होती. त्यामुळे नंदिनीने कानपूर सोडून नवी मुंबई गाठली. त्यानंतर ती नवी मुंबईतील ऐरोलीतील सेक्टर १ मध्ये पेईंग गेस्ट म्हणून राहू लागली. अशावेळी घरभाडे आणि आई वडिलांच्या आजारपणाचा खर्च झेपत नसल्याने तिने आत्महत्या केली. १२ हजार वेतनावर ती एका कंपनीत नोकरी करायची, मात्र या वाजवी पगारात तिचा सर्व खर्च भागत नव्हता.

तिचे सहकारी गावी गेल्याने काही दिवसांपासून ती एकटीच राहू लागली होती. तिच्या स्वभावाने तिची शेजाऱ्यांशी चांगली मैत्री झाली होती.



शनिवारपर्यंत तिने कोणाशीही संपर्क केला नाही. घराचा दरवाजा आतून बंद असल्याचं पाहून शेजाऱ्यांनी रविवारी दुपारी बनावट चावीचा वापर करत बंद असलेला दरवाजा उघडला. अशावेळी तिचा गळफास घेतलेला मृतदेह दिसून आला.

अशावेळी तिने एका डायरीत मनातली सल व्यक्त करत लिहिली आणि आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी तिने डायरीत लिहिलं की, मिळणाऱ्या पगारातून काही भागत नसल्याची खंत तिने व्यक्त केली आहे. संबंधित प्रकरणात पोलिसांनी तपास केला आहे.

महिला पोलीस निरीक्षक वृषाली पवार यांनी सांगितले की, तरुणीने आर्थिक अडचणीतूनच पुन्हा कानपूरला जाण्याचा निर्णय घेतला होता, असे तिने मैत्रिणीला सांगितले होते. मुंबईत येऊन तिचा अपेक्षाभंग झाल्यानं तिने आत्महत्या केली. याबबत तिच्या कुटुंबियांना कळवले असून यातील पुढील अधिक तपास सुरू आहे.

# अमर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे कळंबोली मंडळ अध्यक्ष तथा पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर अरुण पाटील यांचा वाढदिवस सोमवारी (दि.१६) विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. यानिमित्त कळंबोलीमध्ये ३ ठिकाणी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरांचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी अमर पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच त्यांनी राबवलेल्या या सामाजिक कार्यक्रमामुळे सर्वांना प्रेरणा मिळाली असल्याचे प्रतिपादन केले.

भारतीय जनता पक्षाचे कळंबोली मंडल अध्यक्ष अमर अरुण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोलीतील सेक्टर ३ मधील सिटी हॉस्पिटल येथील रुग्णालयात जनरल चेकअप, कान,



नाक, घसा, डोळे व दंतरोग तपासणी, सेक्टर १६ मधील आशा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जनरल चेकअप, कान, नाक, घसा, रक्तदाब, रक्त तपासणी, तसेच गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी, तर सुश्रुत हॉस्पिटल येथे जनरल चेकअप, कान, नाक, घसा, आणि हाडांची तपासणी करण्याबरोबरच औषधे मोफत देण्यात आली. या शिबिरांना नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, राजू शर्मा, रवी भगत, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष प्रिया मुकादम, भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, साऊथ सेल उपाध्यक्ष रमेश नायर, जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, उपाध्यक्ष संदीप भगत, सुनील ढेबरे, जोहेब पटेल, ज्येष्ठ नेते गुरुनाथ ठाकूर, अमर ठाकूर, महिला अध्यक्ष मनीषा निकम, बैजा बारगजे, सरस्वती कथारा, शुभांगी निर्मले, सुनीता हिरवले, नीता अधिकारी, विजया कदम, उमा राव, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, निशांत गिल, केशव यादव, विष्णू गायकवाड, निलेश भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



**खारघर : माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर यांच्या माध्यमातून आणि ओमसाई प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने मोफत छत्री वाटपाचा कार्यक्रम रविवारी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी उपस्थित राहून छत्र्यांचे वाटप केले तसेच गुरूनाथ गायकर यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, प्रवीण पाटील, ब्रिजेश पटेल, अभिमन्यू पाटील, अजय माळी, ज्येष्ठ नागरिक अध्यक्ष प्रवीण शिंदे, सुदर्शन नाईक आदी उपस्थित होते.**

# जागृतेश्वर मैदानातील सभामंडपाचे लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील प्रसिद्ध अशा जागृतेश्वर मैदानातील सभा मंडपाचे लोकार्पण करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक नाथा सरगर यांनी ही उद्घाटन केले. आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार विकास निधीमधून २५ लाख रुपये खर्च करून हा सभा मंडप उभारण्यात आला आहे. या वेळी आमदार मंदा म्हात्रे उपस्थित होत्या.

आमदार म्हात्रे हणल्या की, वाशी गावातील जागृतेश्वर मैदानामध्ये अनेक मैदानी खेळ खेळाडू खेळत असतात. तसेच सदर मैदानात विविध प्रकारच्या स्पर्धा देखील आयोजित केल्या जात होत्या, परंतु मैदानामध्ये सभा मंडप नसल्यामुळे वाशी गावातील स्थानिक खेळाडूंना लाकडी मंडप उभारावे लागत होते. ही बाब खर्चिक होती. वाशी गावातील स्थानिक खेळाडू प्रवीण भगत व ४०+ खेळाडू यांनी आमदार मंदा



म्हात्रे यांच्याकडे मागणी केली होती की, सदर मैदानामध्ये सभा मंडप उभारून द्यावेत. याच अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकास निधीमधून २५ लाख रुपये खर्च करून भव्यदिव्य सभा मंडप व क्रिकेट साहित्य व्यवस्थित ठेवता यावे यासाठी दोन वैयक्तिक खोल्या देखील तयार करण्यात आल्या. त्यामुळे क्रिकेटपटूंनी समाधान व्यक्त केले आहे.

या वेळी भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी महापौर अनिल कौशिक, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे, मंगेश चव्हाण, दलविंदर सिंग, नंदकुमार भगत, भरत मावळे, प्रताप भोसकर, रामकृष्ण अय्यर, प्रवीण चिकणे, मालती सोनी, सुमा रणजीत, क्षितिजा घोरपडे तसेच वाशी गावातील स्थानिक नागरिक व खेळाडू उपस्थित होते.

# आम्रमार्ग उड्डाणपुलाखालील पादचारी भुयारी मार्गाचे लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरातील बेलापूर किल्ला–उरण हायवे येथील नवी मुंबई महानगरपालिका जवळील उड्डाणपूल आहे. बेलापूर गावातील असंख्य नागरिक उरण व वाशी येथे कामानिमित्त जाण्याकरिता त्या रस्त्याचा वापर करीत असतात, परंतु हा रस्ता ओलांडतांना अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या ठिकाणी पादचारी मार्ग असावा, अशी मागणी नागरिक करत होते. त्यानुसार आमदार मंदा म्हात्रे यांच्या निधीतून या ठिकाणी पादचारी भुयारी मार्गाची निर्मिती करण्यात आली होती. या मार्गाचे लोकार्पण आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

१७ डिसेंबर २०२३ रोजी रात्री ८ च्या सुमारास बेलापूर गावातील सीमा नारायण मुकादम व त्यांच्या



सुनेचा या ठिकाणी अपघात झाला होता. यात सीमा मुकादम यांचा दुर्दैवी अपघात होऊन त्या जागीच मृत्यूमुखी पडल्या. बेलापूर गावातील स्थानिक नागरिकांची अशी मागणी केली होती की, की बेलापूर गाव सेक्टर १९/२० समोरील आम्रमार्ग उड्डाणपुलाखालून पादचारी मार्ग तयार करावा. त्यादृष्टीने आमदार म्हात्रे यांनी आमदार निधी देत पालिकेकडे मागणी केली होती. त्यानुसार पालिकेने येथे पादचारी भुयारीमार्ग तयार केला. त्याचे उद्घाटन आमदार म्हात्रे यांनी केले. या वेळी माजी नगरसेवक दि.ना. पाटील, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, मुख्य शहर अभियंता शिरीष आरदवाड, विभागीय अधिकारी डॉ. अमोल पालवे, कार्यकारी अभियंता वाघचौरे साहेब उपस्थित होते.

या वेळी आमदार म्हात्रे म्हणाल्या की, बेलापूर गाव ते उरण हायवे रस्ता ओलांडतांना नागरिकांना सुरक्षितेच्यादृष्टीने त्या भुयारी मार्गामुळे मोठी सोय उपलब्ध झाली आहे. विशेषतः महिलांकरिता व वाशी येथे जाणाऱ्या शाळा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच नवी मुंबई महापालिकेमधील नोकर वर्गाला याचा सर्वाधिक उपयोग होणार आहे.

या वेळी ज्येष्ठ नागरिक नारायण मुकादम, समाजसेविका ज्योती पाटील, समाजसेवक कुंदन म्हात्रे, सुधाकर म्हात्रे, नंदकुमार म्हात्रे मनोज म्हात्रे, शैलजा म्हात्रे, निशा म्हात्रे, सुर्यकांत म्हात्रे, कल्पेश कुंभार, चंद्रकांत पाटील, वैभव मुकादम, चंद्रकांत कोळी, ज्ञानेश्वर कोळी तसेच बेलापूर गावातील असंख्य नागरिक उपस्थित होते.

# श्री संत तुकाराम महाराज दिंडीचे स्वागत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गांवर कस्तुरी घाटात हनुमान मंदिरासमोर श्री संत तुकाराम महाराज कोंकण दिंडीचे आंतरराष्ट्रीय बजरंग दल कोंकण प्रांताच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.

या वेळी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विठुरायाच्या भेटीला निघालेल्या वारकरी भक्तांवर आंतरराष्ट्रीय बजरंग दल कार्यकर्त्यांनी पुष्प वर्षाव, तसेच पानी व शितपेय्यांचे वाटप केले.

या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय बजरंग दल कोंकण प्रांत महामंत्री सचिन खुळे, रायगड जिल्हा मंत्री वैभव कशेळीकर, मातृ शक्ती परिषद रायगड जिल्हा अध्यक्षा भक्ती भाबल, पनवेल अध्यक्षा उषा उप्ता, उरण विधानसभा मंत्री साजन वास्कर, उरण अध्यक्ष जनार्दन मालुसरे, गोरक्षा परिषद उरण विधानसभा अध्यक्ष मल्लेश गुडसे, खालापूर विधानसभा अध्यक्ष प्रशांत तांबोळी आदी उपस्थित होते.



# अभीष्टचिंतन



**पनवेल : भाजप नेते सुधीर ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी जि.प. सदस्य जीवन गावंड, भाऊ भोईर, संदीप म्हात्रे, रोशन म्हात्रे, गजानन घरत, निकेत देशमुख, कमलाकर घरात, सुमित पाटील आदी उपस्थित होते.**

# मॉडर्न स्कूलमध्ये प्रवेशोत्सव साजरा



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मॉडर्न स्कुल, वाशी येथे शाळेच्या पहिल्या दिवशी शैक्षणिक साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक वर्षात स्वागत करण्यात आले.

शैक्षणिक वर्षा २०२४–२५ पासून पहिली ते बारावीमधील सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याचा निर्णय शिक्षण मंडळाकडून घेण्यात आल आहे. त्यानुसार रयत शिक्षण संस्थेच्या नवी मुंबई वाशी येथील मॉडर्न स्कूलमध्ये इयत्ता पाचवी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तू देऊन देऊन विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या सुमित्रा भोसले, पर्यवेक्षक आबासाहेब वाघ, पर्यवेक्षिका हना सरेला, मनीषा सकपाळ त्याचप्रमाणे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# गटाराचे पाणी गावासह शेतात

- खांदाड गावात दुर्गंधी, नागरिकांचे आरोग्य धोक्यात
- शेतीजमीन झाली नापीक, नुकसानभरपाईची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

गेली दोन दिवस पडलेल्या धुवांधार कोसळणाऱ्या पावसाने माणगाव शहराला झोडपून काढले आहे. त्यामुळे नदी, नाले, गटारे आणि शेती पाण्याने तुडुंब भरून ओसंडून वाहत आहेत, मात्र शहरातील विविध भागातील गटरातील सांडपाणी आणि मलमुत्र खांदाड गावाच्या परिसरात येत असल्याने अतिशय दुर्गंधी येत आहे. त्यामुळे खांदाड गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे तसेच हे गटाराचे पाणी शेतजमिनीत घुसून दरवर्षी भातशेतीचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे येथील शेकडो एकर जमीन नापीक बनली आहे. याची नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी खांदाड येथील शेतकऱ्यांनी केली आहे.



माणगाव शहरातील मोर्बा रोड, कमल फर्निचर, एसटी बस स्थानक येथील दुतर्फा असलेल्या गटाराचे सांडपाणी आणि मलमुत्र तसेच पावसाचे पाणी खांदाड गावात येत असल्याने दुर्गंधी पसरली आहे. मोरबा रोड येथील गटारांची साफसफाई दोन वर्षांपासून केलेली नाही. त्यामुळे या महामार्गावरील गटारात सर्व प्रकारचा कचरा, सांडपाणी आणि मलमुत्र तसेच पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात तुंबलेल्या अवस्थेत होते. या पाण्याला कोठेही जाण्यासाठी मार्ग नाही. पाणी जाण्याचे सर्व मार्ग बंद झाले आहेत. त्यावर पावसाळ्यापूर्वी कोणतीही कारवाई किंवा उपाययोजना करण्यात आली नाही. सांडपाणी जाण्यासाठी मोर्यांचे मार्ग बंद झाले आहेत. त्यामुळे घाण सांडपाणी उलट सुलट फिरत खांदाड गावातील लोकांच्या दारात पोहचले आहे. यानंतर अधिक पाऊस पडला आणि पूर परिस्थिती निर्माण झाली तर खांदाड गावातील लोकांच्या दारात आणि घराघरात सांडपाणी जाऊन नुकसान होऊ शकते. सतत पाणी तुंबल्याने येथील ग्रामस्थांच्या आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच रोगराई पसरण्याची शक्यता आहे. हे घाण आणि दुर्गंधी येत असलेल्या पाण्यातून वाट काढत घरात वावर करावा लागत आहे.

या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी होत आहे. तसेच जवळपास माणगाव शहरातील सांडपाणी खांदाड, मोरबा रोड, बामणोली रोड येथील शेकडो एकर जमिनीत घुसून दरवर्षी भातशेतीचे अतोनात नुकसान होत आहे. वारंवार मागणी करूनही प्रशासन दुर्लक्ष करून कानाडोळा करीत आहे. संपूर्ण शेतजमीन नापीक बनली आहे. पावसाळ्यात शेती करता येत नाही. शेती केली तर उभी पिके करपून जातात. येथील शेती हे एकमेव उत्पन्नाचे साधन आहे, मात्र तेही हिरावले गेले आहे. खांदाड गावातील तुंबलेल्या पाण्यात मगरी दबा धरून बसलेल्या आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी अंधारात बाहेर पडणे अशक्य आणि अवघड होऊन बसले आहे. या मगरींची टांगती तलवार मानेवर कायम राहीली आहे.

सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. शेतात कायमस्वरूपी पाणी तुंबल्याने यावर्षीही शेतकऱ्यांनी पेरणी केली नाही. पुरनियंत्रण नियम आल्याने घरेही बांधू शकत नाही. त्यामुळे येथील ग्रामस्थांची अत्यंत बिकट अवस्था झाली आहे. या सर्व समस्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# समुद्रात उंच लाटा; श्रीवर्धन किनारी पर्यटकांची गर्दी

## प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

शनिवार व रविवार या सुट्ट्यांच्या दिवसांमुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी पर्यटकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. सोमवारपासून राज्यातील सर्व शाळा सुरू होणार असल्यामुळे शेवटचा वीकेंड म्हणून पर्यटकांची गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले, परंतु सद्यस्थितीला समुद्र अत्यंत खवळलेला आहे. समुद्रामध्ये उंच उंच लाटा उसळत आहेत, मात्र अशाही परिस्थितीमध्ये अति उत्साही पर्यटकांनी समुद्राच्या पाण्यात जाऊन समुद्र स्नानाचा आनंद घेण्यात धन्य मानले.



सर्वत्र मान्सूनच्या पावसाला सुरुवात झाली आहे. मान्सूनचा पाऊस सुरू झाला की, समुद्र खूप मोठ्या प्रमाणात खवळतो. समुद्र खवळल्यानंतर भरतीचे पाणी नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात पुढे येते व ओहोटीच्या वेळेलादेखील पाण्याला खूप मोठ्या प्रमाणात करंट असतो. या वेळी समुद्राचे पाणी दिसेल त्या गोष्टीला आतमध्ये खेचत असते. रविवारी पंचमीचा दिवस असल्यामुळे दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान समुद्राला भरती होती व त्यानंतर ओहोटी सुरू झाली. सायंकाळी चार ते सात या दरम्यान ओहोटीचे पाणी खूप मोठ्या प्रमाणात आतमध्ये जात असते.

समुद्र खवळलेला असला तरीही प्रशासनाकडून श्रीवर्धन समुद्रकिनारी कोणत्याही प्रकारच्या सूचना किंवा बावटा लावण्यात आलेला नाही. तसेच समुद्रात पोहणाऱ्या पर्यटकांना आवर घालण्यासाठी त्या ठिकाणी कोणीही प्रशासनाच्या जबाबदार व्यक्ती उपस्थित नव्हत्या. पर्यटकांनी समुद्रात उतरू नये. अशा प्रकारचे फलक किंवा सूचना देण्यासाठी त्या ठिकाणी प्रशासनाने काही कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. श्रीवर्धन समुद्र किनारा हा अत्यंत सुरक्षित असा किनारा मानला जातो.

कारण या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे खडक नाहीत किंवा समुद्राची खोलीदेखील खूप मोठ्या प्रमाणावर नाही, परंतु समुद्र खवळलेला असल्या कारणाने त्या ठिकाणी प्रशासनाने काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

# निजामपूर विभागातील पहिल्या वीरगळ स्मारकाचे लोकार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

किल्ले कुर्डूगडाच्या पायथ्याशी वसलेल्या बोरवली या ऐतिहासिक गावात टीम कुर्डूगड संस्था आणि बोरवली ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून निजामपूर विभागातील पहिलंवहिलं वीरगळ स्मारकाचा लोकार्पण सोहळा माणगाव तालुक्यातील माजी सैनिकांच्या उपस्थितीत झाला.



निजामपूर विभागातील कुर्डूगड किल्ल्यावर टीम कुर्डूगडचे सदस्य दरवर्षी संवर्धन मोहिमांच्या माध्यमातून जतन, दुरूस्तीचे कार्य करत आहेत. यासोबतच गडपायथा परिसरातील ऐतिहासिक वास्तूंचे अवशेष जतन संवर्धन व्हावेत या हेतूने बोरवली गावातील काळभैरव मंदिरासमोरील १९ वीरगळांची स्वच्छता करून ऊन वारा पावसापासून दीर्घकाळ संरक्षण होण्यासाठी कायमस्वरूपी चौथरा बनवला आहे. तसेच त्यावर छप्पर सुध्दा बनवले असून कुर्डूगडाकडे येणाऱ्या पर्यटकांना हे वीरगळ स्मारक पाहायला मिळणार आहे. अकराव्या शतकात शिलाहार आणि यादव या दोन प्रबळ राजसत्तांमधील संघर्षात बलिदान दिलेल्या वीरांची स्मारके जतन होणे गरजेचे आहे असे मत इतिहास अभ्यासक रामजी कदम यांनी या वेळी व्यक्त केले.

वीरगळ स्मारक लोकार्पण सोहळ्याप्रसंगी देणगीदार, दुर्गसंवर्धन करत असलेल्या शिवप्रतिष्ठान उंबर्डी, शौर्यसह्याद्री डव्हेंचर, आम्ही सह्याद्रीचे शिलेदार, दुर्गवीर प्रतिष्ठान, टीम दातेगड, टीम कोहोज या संस्थांच्या प्रतिनिधींचा आणि बोरवली ग्रामस्थांचा सन्मान करण्यात आला.

या वेळी माणगाव तालुका माजी सैनिक संघटना अध्यक्ष सहदेव खैरे, सचिव ऋषिकेश शिंदे, माजी सैनिक कॅप्टन निर्मलसिंग रंधवा, माजी सैनिक सत्यनारायण, सुप्रसिद्ध उद्योजक महेंद्र साळवी, इतिहास अभ्यासक रामजी कदम, जिते ग्रामपंचायत माजी सरपंच तृप्ती साळवी, उद्योजक जनार्दन मानकर, भागेश करावडे, रमेश करावडे आदी उपस्थित होते.

वीरगळ स्मारक उभारण्यासाठी टीम कुर्डूगडचे दिवेश कदम, प्रमोद पडवळ, आकाश सिलीमकर, सूरज जोरकर, सानिया साळवी आणि त्यांच्या सहकारी मावळ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# प्राईम माईंड्स इंग्लिश मीडियम स्कूलचे उद्घाटन

**नागोठणे : बातमीदार**

आज नागोठणे येथे दफेदार एज्युकेश ट्रस्टच्या प्राईम माईंड्स इंग्लिश मिडीयम स्कुलची स्थापन झाली असून या स्कुलच्या माध्यमातून शैक्षणिक क्रांती घडण्यासाठी मोलाची मदत होणार आहे. या स्कुलच्या माध्यमातून मुलांना चांगले शिक्षण मिळणार आहे असे सांगून शिक्षण ही काळाची गरज असून प्रत्येक मुलांनी चांगल्या प्रकारे शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षण हे वाघिणीचे दुध असून जो प्यायला तो समाजात अन्याय होत असेल तर तो गुरगूरल्या शिवाय राहणार नाही असे उदगार नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी काढले.





रविवारी सकाळी ११.३० वाजता नागोठणे बाजारपेठ मधील मध्ये दफेदार एज्युकेश ट्रस्टच्या प्राईम माईंड्स इंग्लिश मिडीयम स्कुलच्या प्लेग्रुप, नर्सरी, जुनिअर आणि सिनियर केजी या वर्गांचे उदघाटन पोलीस अधिकारी सचिन कुलकर्णी व नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक यांच्या हस्ते झाले. त्यावेळी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना पोलीस अधिकारी सचिन कुलकर्णी बोलत होते.

या वेळी नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी व नागोठणे सरपंच सुप्रिया संजय महाडिक यांच्यासमवेत श्रीमती शिला मोदी, दफेदार एज्युकेश ट्रस्टचे चेअरमन असिफ दफेदार, डॉ. अजहर दफेदार, माजी सरपंच तथा नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू स्कुलचे संस्थापक सेक्रेटरी लियाकतशेठ कडवेकर, ग्रामपंचायत उपसरपंच अकलाख पानसरे, सदस्या शभाना मुल्ला, युवा नेते सद्दाम फर्मान दफेदार, राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय अध्यक्ष तथा पिगोंडे सरपंच संतोषभाई कोळी, सागिर अधिकारी, पप्पूशेठ अधिकारी, जहूरुद्दीन सय्यद, कडसुरे उपसरपंच रविंद्र शिर्के, डॉ. रोहिदास शेळके, बाबा मुल्ला, मुंब्रा ठाणे येथील सामाजिक कार्यकर्ते निसार खान, असिफ मुल्ला, विवेक सुभेकर, यशवंत चित्रे, दौलत मोदी, अष्टविनायक पतसंस्थेचे संचालक रोहिदास हातनोलकर इर्षाद कुनके सर, पप्पू हाफिज, रोशन पारंगे, मनोज ताडकर, एजाज मोहने, अतिक अन्सारी सर, मुजफ्फर कडवेकर, डॉ. अमिता मोदी, डॉ. सादिया दफेदार, डॉ. तंदिका दफेदार, जावेद दफेदार, फजल दफेदार, रमीज दफेदार, संदेश बैकर, गौतम जैन, मदन गायकर आदी मान्यवरांसह नागोठणे शहर व विभागातील शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इकबाल शेख सर यांनी तर आभार प्रदर्शन स्कुलचे चेअरमन असिफ दफेदार यांनी केले.

# विद्यार्थ्यांचे शाळेत स्वागत

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद अंतर्गत असणाऱ्या शाळा यांचा पहिला दिवस हा प्रवेशोत्सव दिन म्हणून साजरा करण्यात आला. सदर दिना अंतर्गत शाळेमध्ये पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ, फुगे व चॉकलेट देऊन करण्यात आले.



माझे पहिले पाऊल अंतर्गत पहिलीतील विद्यार्थ्यांच्या पाऊलाचे ठसे कागदावर घेण्यात येऊन त्याची एक प्रत पालकांना देण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांची गावातून ढोल ताशांच्या गजरात प्रभात फेरी काढण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश, बूट व सॉक्स यांचे वाटप करण्यात आले.

मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार व सोबत गोड पदार्थ म्हणून जिलेबी देण्यात आली. शाळेमध्ये यावर्षीपासून सीबीएसई पॅटर्न इयत्ता पहिली पासून सुरू झालेला आहे त्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. खर्चिक इंग्रजी माध्यमाच्या शाळांपेक्षा सीबीएसई पॅटर्न असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या मराठी शाळा उत्तम आहेत असे मत पालकांनी व्यक्त केले. अशा प्रकारच्या कार्यक्रमांमुळे जनजागृती होऊन जिल्हा परिषदेच्या मराठी शाळा विषयी समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन तयार होण्यास मदत झाली आहे.

आजच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमासाठी पोलीस ,तलाठी, ग्राम पंचायत अधिकारी, शिक्षण अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते,सरपंच, उपसरपंच व सदस्य, गावचे पोलीस पाटील आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

# सकल मराठा सामाजिक संस्थेच्या अलिबाग तालुकाध्यक्षपदी अभय म्हामुणकर

**अलिबाग : प्रतिनिधी**

सकल मराठा सामाजिक संस्थेच्या अलिबाग तालुका अध्यक्षपदी अभय म्हामुणकर यांची एकमताने निवड करण्यात आली. अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथे झालेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अलिबाग तालुका कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली.



या वेळी सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचे नववे वंशर्जे राज्य शासनाच्या गड किल्ले संवर्धन समिती सदस्य रघुजीराजे आंग्रे, जय भवानी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन ॲड. मिलिंद चव्हाण, सकल मराठा सामाजिक संस्थेचे सल्लागार नरेश सावंत, सल्लागार अनिल गोळे आदी पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी सकल मराठा सामाजिक संस्था अलिबागच्या मावळत्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्याचबरोबर नवनिर्वाचित कार्यकारिणीतीळ पदाधिकाऱ्यांचा सन्मानदेखील या वेळी करण्यात आला.

मराठा समाजाला एकत्रित करून संघटना बळकट करणे आणि मराठा जात प्रमाणपत्र व मराठा जात पडताळणी याबाबत या सभेत चर्चा करून शंकांचे निरसन करण्यात आले.

सकल मराठा सामाजिक संस्थेच्या अलिबाग तालुकाध्यक्षपदी अभय म्हामुणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर कार्याध्यक्षपदी समरस शेळके, उपाध्यक्ष कृष्ण जाधव, उपाध्यक्ष नंदकुमार पवार, उपाध्यक्ष प्रेरणा कदम, उपाध्यक्ष जगदीश सावंत, सचिव उल्हास पवार, सहसचिव नयन जरांडे, खजिनदार सुरेंद्र शेळके, सहखजिनदार राम कदम, संघटक प्रदीप ढवळे, तर सदस्य म्हणून आनंद जाधव, दीपक गावडे, प्रभाकर मोहिते, संजय राणे, विजेंद्र गावडे, सुरेश साळुंखे, जितेश जवके, तृप्ती घोसाळकर, प्रज्ञा पाशिलकर, सुषमा शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# 'भारतीय संविधानाचे प्रत्येकाने आचरण केल्यास देश अफाट उंचीवर'

**पाली : प्रतिनिधी**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय संविधानाच्या आधारे प्रत्येक नागरिकाने आचरण करून प्रत्येकाला शिक्षित केल्यास भारत एका अफाट उंचीवर असेल, आणि त्या उंचीचा एक भाग आपण असू, असे उदगार भीमराव आंबेडकर यांनी काढले.



जगभरात भारतासारख्या बुद्धाच्या महान भूमीतून आलेल्यांना मोठा सन्मान मिळतोय, बौद्ध धम्माचा प्रचार करणाऱ्या भारतीय बौद्ध महासभेचे नाते जगाशी जुळले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माच्या ओंजळीत टाकले. हा धम्म संपूर्ण जगाला अहिंसा, प्रेम करुणा, बंदुभाव, विज्ञानवाद, मानवता व समानतेची शिकवण देतोय. म्हणून आज जगाला युद्ध नको बुद्ध हवाय, हे आता सर्वांना पटू लागले आहे असे भीमराव आंबेडकर म्हणाले. जगात सर्वत्र शांती,बंधुता, एकता, सुख समाधान नांदावे यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करावे, असे आवाहन आंबेडकर यांनी या वेळी केले.

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तसेच भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव यशवंत आंबेडकर यांचे खालापूर तालुक्याच्या दौऱ्यात ठिकठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले. या वेळी धम्मबांधव राम डोंगरे यांच्या सुसज्य व भव्य इमारतीचे शानदार उदघाटन भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आंबेडकर यांच्या हस्ते फित कापून गृह प्रवेश करण्यात आला.

या वेळी आंबेडकर यांनी आपल्या प्रभावी मनोगतातून महान संदेश दिला. भीमराव आंबेडकर यांचे सर्वत्र मोठ्या उत्साहात सन्मानपूर्वक स्वागत करण्यात आले. या वेळी पूजनीय भिखु संघ तेलंगणा, हैद्राबाद तसेच बौद्धचार्य व धम्मबांधव, भारतीय बौद्ध महासभेचे राज्य, जिल्हा व तालुका स्थरिय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भीमराव आंबेडकर यांच्या आगमना वेळी गावकऱ्यांनी फटाक्यांच्या आतिशबाजी करून आनंदोत्सव साजरा केला.

# राजिप कशेणे शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरुवात सोमवार दि १६ जून २०२५ रोजी माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा कशेणेमध्ये मोठ्या उत्साहाने व आनंददायी वातावरणामध्ये सुरुवात करण्यात आली.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्यामार्फत शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६च्या आदेशानुसार शाळेमध्ये इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा पावसाच्या साथीने व लेझीमच्या संगीतात साजरा करण्यात आला. दाखलपत्र विध्यार्थ्यांची गावातून मिरवणूक काढणेत आली. शाळेच्या प्रांगणात आल्यावर विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी कशेणे गाव कमिटीचे अध्यक्ष शामकांत शिंदे, गाव कमिटीचे उपाध्यक्ष तुकाराम मुंढे, विघवली केंद्राचे केंद्रप्रमुख विठोबा उभारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व कशेणे गाव पाणी कमिटीचे अध्यक्ष प्रकाश सायगावकर, उपाध्यक्ष संजीवन मोरे, सदस्य तुकाराम शिंदे, गणपत शिंदे, माजी पोलीस पाटील सुरेश मोरे तसेच शिक्षणप्रेमी सदस्य शांताराम राऊत, खजिनदार अथर्व शेठ, सिताराम शिंदे, शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष स्नेहा पांचाळ, अंगणवाडी ताई कारंजकरबाई, निशा मुंढे,समिता पोटले, सुरेखा शिंदे, दीपा गायकवाड, आदिती राऊत, चंद्रकला भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. सुरवातीला विद्येची आराध्य देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्याहस्ते फित कापून प्रवेशोत्सव सोहळ्याचे उदघाटन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका अपूर्वा जंगम व सहाशिक्षिका दिप्ती ढपे यांनी उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या मुलांचे पहिले पाऊल कुंकवाच्या साहाय्याने संस्मरणीय करण्यात आले.दाखल मुलांना पाटी, पेन्सिल, वही, अंकलिपी, खडू, रंग, फुगा व खाऊ इत्यादी साहित्य देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी विध्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट व पायमोजे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.



# फायनल हरल्यानंतरही ऑस्ट्रेलिया कसोटीत नंबर वन!

**दुबई : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पराभव करत दक्षिण आफ्रिकेने कसोटी विश्वचषकावर आपले नाव कोरले. या पराभवानंतरही ऑस्ट्रेलियाचा संघ आयसीसी टेस्ट रँकिंगमध्ये अव्वल स्थानावर कायम आहे.



वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल जिंकूनही दक्षिण आफ्रिका संघ अव्वल स्थानापासून वंचित राहिला, पण त्यांना फायनल जिंकण्याचा फायदा झाला आहे. कारण हा संघ आता आयसीसी टेस्ट रँकिंगमध्ये तिसऱ्यावरून दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात पराभव पत्करूनही ऑस्ट्रेलियाच्या खात्यात १२३ गुण, तर दक्षिण आफ्रिकेच्या खात्यात ११४ गुण आहेत.

इंग्लंडचा संघ तिसऱ्या स्थानी असून त्यांच्या खात्यात ११३ गुण आहेत. रँकिंगमध्ये इंग्लंडला एका स्थानाचे नुकसान सहन करावे लागले आहे. भारतीय संघ १०५ गुणांसह चौथ्या क्रमांकावर आहे.

### उद्यापासून नवे चक्र

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचे पुढील चक्र १७ जूनपासून सुरू होणार आहे. पहिला सामना श्रीलंकेतील गॅले येथे श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यात खेळवला जाईल. एकूण ७१ सामने असलेले आणि पुढील दोन वर्षांच्या कालावधीत होणाऱ्या डब्ल्यूटीसी २०२५-२७ या चक्रामध्ये नऊ संघ सहभागी होतील. वेळापत्रकानुसार ऑस्ट्रेलिया या वेळी जास्तीत जास्त २२ सामने खेळेल, तर इंग्लंडला २१ सामने खेळावे लागतील. विश्वविजेता दक्षिण आफ्रिका संघ ऑक्टोबर २०२५मध्ये पाकिस्तानमध्ये नवीन चक्रातील पहिली कसोटी मालिका खेळेल.

# विजयी मिरवणुकीसाठी बीसीसीआय तयार करणार आता नियमावली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



यंदा आयपीएल हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी)ने पहिल्यांदाच विजेतेपद पटकावल्यावर बंगळुरूमध्ये सार्वजनिक विजय सोहळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेनंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) भविष्यातील अशा कार्यक्रमांसाठी सुरक्षा नियमावली तयार करण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे.

बीसीसीआयच्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, बंगळुरू येथे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने व्यापक नियमावली तयार करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात येत आहे.

ही समिती बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांच्या अध्यक्षतेखालील असून उपाध्यक्ष राजीव शुक्ला आणि कोषाध्यक्ष प्रभतेज सिंग भाटिया हे इतर सदस्य असतील. बीसीसीआयच्या अलीकडील अॅपेक्स कौन्सिल बैठकीत या समितीची घोषणा करण्यात आली. समितीला १५ दिवसांच्या आत आपला अहवाल सादर करायचा आहे.

हा निर्णय भविष्यातील बीसीसीआय किंवा तत्सम मोठ्या कार्यक्रमांमध्ये अशा अपघातांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

# प्रत्येक खेळाडू सुरक्षित, आनंदी राहील अशी टीम संस्कृती निर्माण करणार

## शुबमन गिलचा मानस

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार शुबमन गिल याने कधीच भारतीय संघाचे नेतृत्व करण्याचे स्वप्न पाहिले नव्हते, मात्र आता त्याने स्वतःसाठी असे उद्दिष्ट ठेवले आहे की, जिथे प्रत्येक खेळाडू 'सुरक्षित आणि आनंदी' राहील, अशी टीम संस्कृती निर्माण करण्याचा त्याचा मानस आहे.

बदलाच्या टप्प्यात असलेल्या भारतीय संघासमोर २००७ नंतर प्रथमच इंग्लंडमध्ये कसोटी मालिका जिंकण्याचे आव्हान आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची कसोटी मालिका २० जूनपासून लीड्स येथे सुरू होणार आहे.

या पार्श्वभूमीवर गिल म्हणाला, मी कधीच स्वप्नातही विचार केला नव्हता की मी भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार बनेन. त्यामुळे सर्व ट्रॉफ्या मिळवण्यापेक्षा, मी अशी टीम संस्कृती निर्माण करू इच्छितो जिथे प्रत्येकजण खूप सुरक्षित आणि आनंदी असेल. त्याने पुढे म्हटले मला माहीत आहे की, स्पर्धा आणि सतत होणाऱ्या सामन्यांच्या पार्श्वभूमीवर हे खूप कठीण असू शकते, पण जर मी हे करू शकलो तर तेच माझे खरे उद्दिष्ट असेल. एक सुरक्षित वातावरण तयार करणे आणि खेळाडूंना त्यांच्या क्षमतांमध्ये सुरक्षित वाटेल हे नेतृत्वकर्त्याने करणे आवश्यक आहे.

गिलने मान्य केले की, नुकतेच कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झालेल्या रोहित शर्माने त्याच्यासाठी स्पष्ट मार्ग दाखवला आहे. 'कदाचित रोहित आक्रमक वाटत नाही, पण रणनीतीच्या बाबतीत ते खूप आक्रमक आहेत. सामना सुरू होण्यापूर्वी मालिकेदरम्यान आणि नंतरही खेळाडूंशी संवाद साधताना त्याच्यात स्पष्टता असते. रोहितभाई कधी कठोर बोलतो, पण ते खेळाडूंना कधीच वैयक्तिक वाटत नाही, कारण ते संघाच्या दृष्टिकोनातून असते,' असेही गिलने सांगितले.

गिलने पुढे म्हटले की, नेतृत्व स्वीकारण्यापूर्वी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि मुख्य निवडकर्ते अजित आगरकर यांच्याशी चर्चा झाली. त्यांना फक्त एवढेच हवे आहे की, मी नेतृत्वकर्त्याच्या भूमिकेत स्वतःला व्यक्त करावे. त्यांनी माझ्याकडून कोणतीही अतिरिक्त अपेक्षा ठेवलेली नाही, मात्र एक कर्णधार आणि खेळाडू म्हणून माझ्या स्वतःकडून काही अपेक्षा आहेत, असे गिलने स्पष्ट केले.



### रोहित, विराटकडून खूप काही शिकलो!

भारतीय क्रिकेट संघाचा नवा कर्णधार शुबमन गिलने या वेळी सांगितले की, रोहितसोबत संघाच्या भविष्यासंदर्भात अनेकदा चर्चा केली आहे. पुढील पाच, सात, दहा किंवा पंधरा वर्षांत भारतीय संघाची संस्कृती कशी असावी यावर त्याने मार्गदर्शन केले आहे तसेच मी विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली खेळताना क्षेत्ररक्षण, रणनिती आणि त्याची मैदानावरील सक्रियता यापासून खूप काही शिकलो. जर एखादी चाल कामी आली नाही, तर त्याच्याकडे दुसरी योजना असायची. त्याप्रमाणे तो गोलंदाजाला स्पष्टपणे सांगयचा. त्याचा परिणाम दिसून यायचा, असेही गिलने नमूद केले.

# किकबॉक्सिंग स्पर्धेत खांदा कॉलनी शाखा अव्वल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या केवाळे येथील शाळेत करण्यात आले होते स्पर्धेत एकूण २०८ खेळाडूंनी सहभाग घेतला. यामध्ये खांदा कॉलनीतील शिहान प्रतिक कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली २४ खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत सहा सुवर्ण, नऊ रौप्य आणि नऊ कांस्य अशी एकूण सर्वाधिक २४ पदके पटकावली.

विजेत्या खेळाडूंची २६ ते २९ जून रोजी पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धकांना खांदा कॉलनी शाखेचे मुख्य प्रशिक्षक प्रतिक कारंडे व सहाय्यक प्रशिक्षक प्रथम बहिरा यांचे मार्गदर्शन लाभले.

विजेत्या खेळाडूंचे पनवेल शहर किकबॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष तथा महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, सचिव डॉ. मंदार पनवेलकर, कार्याध्यक्ष निलेश भोसले, युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशनचे उपाध्यक्ष रवींद्र म्हात्रे, वरिष्ठ प्रशिक्षक संजय पाटील यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**पदक विजेते खेळाडू**

सुवर्ण : ओम माळी, संस्कृती जाधव, स्पर्श कांबळे, सौम्या पाटोळे, प्रज्वल शर्मा, तेजल भोईटे; रौप्य : अर्णव गावंड, अथर्व शेलार, शास्वत सोरते, एनाक्षी पॉल, दिव्यांश राम, मानव बहेकर, आभास म्हात्रे, अद्वैत गांगुर्डे, विराज पिचड; कांस्य : भक्ती माळी, ओमकार महाडिक, सानवी सांगरे, ध्रुवी पाटोळे, साई कोकिटकर, ध्रुव सुराना, उमर अन्सारी, सोहम पडवळे, विहान गोळे.



# 'डब्ल्यूटीसी'मधील पराभवानंतर ऑस्ट्रेलियन कसोटी संघात बदल

## विंडीजविरुद्धच्या मालिकेसाठी अनकॅप्ड अष्टपैलूचा समावेश

**सिडनी : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५च्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून पराभव पत्करल्यानंतर ऑस्ट्रेलियन संघ आता डब्ल्यूटीच्या चौथ्या पर्वातील आपल्या पहिल्या कसोटी मालिकेसाठी सज्ज झाला आहे. ही मालिका वेस्ट इंडिजविरुद्ध कॅरेबियन भूमीवर २५ जूनपासून सुरू होत आहे. या दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलियन संघाची घोषणा यापूर्वीच करण्यात आली होती, मात्र आता त्यात एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने दिलेल्या माहितीनुसार वेगवान गोलंदाज ब्रेंडन डॉगेटला दुखापत झाल्याने तो विंडीज दौऱ्यातून बाहेर पडला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यासाठी डॉगेटला राखीव खेळाडू म्हणून संघात स्थान मिळाले होते.



आता तो इंग्लंडहून थेट मायदेशी परतला आहे. त्याच्या जागी अष्टपैलू खेळाडू सीन बॉटला संधी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे बॉटने अद्याप कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केलेले नाही, मात्र त्याने वनडे आणि टी-२० सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला श्रीलंका दौऱ्यासाठीही बॉटची निवड झाली होती, परंतु त्याला कसोटी पदार्पणाची संधी मिळाली नव्हती. बॉटने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आतापर्यंत ८८ सामने खेळले असून त्यात त्याने ३०.२९च्या सरासरीने २६७ बळी घेतले आहेत.

**ऑस्ट्रेलियाचा संघ** : पॅट कमिन्स (कर्णधार), स्टीव्ह स्मिथ, उस्मान ख्वाजा, सॅम कॉन्स्टास, मार्नस लॅबुशेन, कॅमेरॉन ग्रीन, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, लेक्स कॅरी, मॅट कुहनेमन, जोश हेझलवूड, नॅथन लायन, सीन बॉट, मिचेल स्टार्क, स्कॉट बोलँड.

**वेस्ट इंडिज संघ** : रोस्टन चेस (कर्णधार), जोमेल वॉरिकन (उपकर्णधार), केव्हलन अँडरसन, क्रेग ब्रॅथवेट, जॉन कॅम्पबेल, केसी कार्टी, जस्टिन ग्रीव्हज, शाई होप, टेव्हिन इमलाच, अल्झारी जोसेफ, शमर जोसेफ, ब्रँडन किंग, जोहान लेने, मिकाइल लुईस, अँडरसन फिलिप, जेडन सील्स.

### दुखापतग्रस्त स्मिथला विश्रांती

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यादरम्यान स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करताना स्टीव्ह स्मिथच्या उजव्या हाताच्या बोटाला दुखापत झाली होती. त्यामुळे त्याच्या फिटनेसबाबतही साशंकता निर्माण झाली आहे. स्मिथला शस्त्रक्रिया करावी लागणार नसली तरी, त्याला पुढील काही आठवडे विश्रांती घ्यावी लागेल.

# महिला वनडे वर्ल्डकप स्पर्धेत भारत-पाकिस्तान संघ भिडणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेचे आयोजन बीसीसीआयकडून केले जाणार आहे. भारतात होणाऱ्या या स्पर्धेला ३० सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत एकापेक्षा एक रोमांचक सामना पहायला मिळू शकतात. दरम्यान, भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघदेखील आमनेसामने येणार आहेत.

या स्पर्धेतील पहिला सामना ३० सप्टेंबरला भारत आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये रंगणार आहे. स्पर्धेच्या तारखा आणि ठिकाणाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे.

भारत आणि पाकिस्तान सामना या स्पर्धेतील मुख्य आकर्षण असणार आहे, मात्र हा सामना भारतात खेळवला जाणार नाही. भारतीय संघाने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी आणि आशिया कप स्पर्धेसाठी पाकिस्तानात जाण्यास नकार दिला होता. त्यामुळे पाकिस्तानचा संघही भारतात येणार नाही. भारत आणि पाकिस्तान हा सामना श्रीलंकेतील कोलंबोत खेळवला जाणार आहे. हा सामना ५ ऑक्टोबरला खेळवला जाईल. त्यामुळे हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाला पाकिस्तानविरूद्ध होणाऱ्या सामन्यासाठी कोलंबोला जावे लागणार आहे, तर पाकिस्तानचे सर्व सामने कोलंबोत खेळवले जाणार आहेत.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com